# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डीचे अधिकृत मासिक

श्री साईनाथ वाचनालय
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.



जगातील कोणत्याही प्राणिमात्राशी बाबा एकरूप झालेले असत. आपल्या भक्ताने कोणत्याही प्राण्याची मनापासून केलेली सेवा बाबांना पोचत असे. तर्खड बाईंनी कुत्र्याला घातलेली भाकरी बाबांना पोचली हे बाबांच्या तोंडून बाईंनी ऐकताच त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला.

श्री साई काव्य बहार विशेषांक.

फेब्रुवारी १९८४) (किंमत १ रु.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


**वर्ष ६२ वे )** **किंमत १ रुपया** **( अंक ११**

श्रीसाईलीला फेब्रुवारी १९८४ दूरध्वनी

श्रीसाई काव्यबहार विशेषांक ८८२२५६१



: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.



वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

जय जय सद्गुरु करुणाकारा ।
जय जय गोदातीर विहारा ।
जय जय ब्रम्हेश रमावरा ।
दत्तावतारा तुज नमो ॥५३॥

ब्रम्हासी जें ब्रम्हपण ।
तें नाहीं सद्गुरुवीण ।
कुरवंडावे पंचप्राण ।
अनन्यशरण रिघावें ॥५४॥

करावें मस्तकें अभिवंदन ।
तैसेंचि हस्तांहीं चरण संवाहन।
नयनीं पाहत असावें वदन ।
घ्राणे अवघ्राणन तीर्थाचें ॥५५॥

श्रवणें साईगुण श्रवण ।
मनें साईमूर्तीचें ध्यान ।
चित्तें अखंड साईचिंतन ।
संसार बंधन तुटेल ॥५६॥

तन–मन–धन सर्व भावें ।
सद्गुरुपायीं समर्पावें ।
अखंड आयुष्य वेचावें ।
गुरु सेवे लागुनी ॥५७॥

– श्रीसाईसच्चरित अध्याय १ ला.

## सुस्वागतम


श्रीसाईलीलाच्या
दहाव्या
लेखक–कवी
स्नेह संमेलन प्रसंगी
आम्ही सर्व लेखक-कवी
हितचिंतक या
सर्वांचे हार्दीक
स्वागत करीत
आहोत.

–संपादक

# श्रीसाईलीला काव्यबहार अंकाचे मानकरी
# फेब्रुवारी १९८४


१) संपादकीय
२) साईबाबा संस्थानची वाटचाल
३) अध्यक्ष श्री. लक्ष्मणराव नाईक
४) आजवरची संमेलने
५) श्रीस्वामी संजयानंद
६) प्रा. डॉ. मा. चिं. दीक्षित
७) श्री. उज्वल कुलकर्णी.
८) डॉ. ग. म. कामत
९) डॉ. इंदुताई नाईक
१०) डॉ. रा. सी. कापडी
११) डॉ. विनायक दुर्गे
१२) डॉ. सौ. सुमती खानविलकर
१३) श्री. विलास पडवळ
१४) प्रा. र. श्री. पुजारी.
१५) प्रा. एच. बी. महाले.
१६) श्री. शांताराम नांदगावकर.
१७) डॉ. सौ. मालती राहाटे.
१८) श्री. नागेश मोंगलाईकर.
१९) सौ. आसावरी वायकूळ.
२०) श्री. बाळकृष्ण देसाई.
२१) सौ. शशिकला रेवणकर.
२२) श्री. रमेश चव्हाण.
२३) प्रा. गंडेराव पटवारी.
२४) सौ. मथुराबाई हिव्वारे.
२५) श्री. प्रकाश कर्पे.
२६) अ. सौ. कै. तारा चंदवणकर.
२७) श्री. शाम जुवळे.
२८) सौ. उषाताई अधिकारी.
२९) श्री. ग. रा. पालकर.
३०) श्री. रमाकांत पंडित.
३१) सौ. अस्मिता दांडेकर.
३२) श्री. प्रभाकर कोळमकर.
३३) सौ. लीलाताई मराठे.
३४) सौ. शांताताई सरोदे.
३५) श्री. हसमुख पाटील.
३६) श्री. रघुनाथ सांडभोर.
३७) सौ. उषाताई मुळे.
३८) श्री. स. व्यं. कुलकर्णी.
३९) संमेलनाचा संपूर्ण कार्यक्रम.
४०) श्री. डी. बी. जगतपुरीया.
४१) सौ. सिंधु भणस.
४२) श्री. व्ही. एस. आकेरकर.
४३) श्री. ग. दे. कुलकर्णी.
४४) श्री. विजय हजारे.
४५) सौ. कलावती चव्हाण.
४६) श्री. राधाकृष्ण गुप्ता
४७) श्री. डी. बी. पोतनीस.
४८) श्री. जगदीश देवपुरकर.

# श्रीसाईलीलाचे दहावे लेखक–कवी संमेलन



श्रीसाईलीला मासिकाचा हा खास काव्यबहार विशेषांक आहे. श्रीसाई भक्त कवी–कवयित्रींनी बाबांच्या बद्दलच्या भावना, श्रद्धा, प्रेम किंवा आपणाला जे काही वाटते ते आपापल्या काव्यधारेवाटे काव्यातून येथे प्रगट केले आहे. एककाळ असा होता की साईलीलाकडे साहित्याची आवक जेमतेमच होती व त्या तशा आलेल्या साहित्यातून निवड करून छापण्यासच योग्य असा मजकूर अगदीच बेताचा होता. त्यामुळे बिचाऱ्या संपादकांना अंकाची इतर पाने कशी काय भरून काढावयाची याची विवंचनाच पडे. परंतु आता श्रीबाबांची कृपावृष्टी म्हणा किंवा आपल्या या संमेलनाचा सुपरिणाम म्हणा साईलीलाचा कारभार व पसारा जगभर झालेला आहे. महाराष्ट्रातूनच नव्हे भारताच्या कोना-कोपऱ्यातूनच नव्हे तर परदेशातूनही श्रीबाबांच्या साहित्याची आवक होत आहे. ४८ ची वाढविलेली ६४ पाने आता अपुरी पडू लागलेली आहेत. त्यामुळे पाने वाढवावीत की आकार वाढवावा असा सहाजकिच प्रश्न डोळयासमोर उभा रहातो, व तो सोडविण्यास श्रीसाई समर्थ आहेत.

फेब्रुवारीचा हा श्रीसाई काव्य बहार विशेषांक ऐन संमेलन प्रसंगी आपल्या हाती देण्यात विशेष आनंद होत आहे. संमेलनाच्या मुहूर्तमेढीनंतर साईकाव्यबहार अंकाची कल्पना बाबांनी आम्हांला दिली तेव्हां संमेलनाच्या नंतर तीन वर्षांनी हा मराठी साहित्यातील आगळा अंक दरवर्षी निघू लागलेला आहे. या अंकात अनेक जुन्या नव्या भक्तांनी हजेरी लावलेली आहे. संमेलनाच्या दशक महोत्सवी सोहळयात हा काव्यबहार सप्तांक आणखीन शोभून दिसेल यात शंकाच नाहीं. भारतातील अनेक थोरामोठ्या साईभक्तांनी अधिकारी व्यक्तींनीं बाबांवर आपली लेखणी कार्यान्वित केली आहे. हे सारे साहित्य एकत्रित पाहून खरोखरच आनंद वाटतो.

दरवर्षाप्रमाणे हे संमेलनही यशस्वी पार पडो अशी शुभकामना श्रीसाई-चरणांपाशी व्यक्त करतो.

॥ जय श्रीसाईराम ॥

# साईबाबा संस्थानची वाटचाल

—कु. रेखा दिघे

संसारात सतत सुख व समाधान मिळावे म्हणून मनुष्याची सर्वतोपरी धडपड चाललेली असते. धडपड करून देखील मनासारखे सुख हे कधीच त्याच्या पदरांत पडत नाही. कारण, सुखाची व्याप्ति व कल्पनाही काही वेगळीच असल्या-मुळे, मिळालेले सुख किंवा पैसा हे नेहमीच त्याला कमी पडत असते. अशा स्थितीत त्याची हाव वाढीसच लागते. शेवटपर्यंत समाधान मिळतच नाही. त्याची धडपड मानमरातब, पैसा, नांवलौकिक मिळविण्याकरिता चाललेली असते. परंतु याचबरोबर मात्र तो स्वतःचे खरेखुरे सुख गमावतच असतो याची जाणीव मात्र त्याला तसूभरही नसते. सतत सुख व पैशाची आस धरणारा मनुष्य एक ना एक दिवस स्वतःला हरवून बसतो. मनुष्य स्वभावच मुळी अत्यंत असंतुष्ट व असमाधानी असल्यामुळे, हाव ही त्याच्या मनांत कायमच कुठेतरी रुतलेली असते. अशा या विचित्र स्थितीत तो मात्र स्वत्व हरवून बसतो, त्याचबरोबर मानसिक व्याधींनाही निमंत्रण देऊन ठेवतो. मानसिक व्याधींबरोबर शारिरीक व्याधीही आल्याच. या सर्वांचा शेवट कशांत आहे, याची मात्र त्याला जाणीवही नसते. या व्याधीचा उगम व उपाय शोधण्याकरिता जेव्हा त्याचे मन आजूबाजूला भरकटू लागते तेव्हाच त्याला कुठेतरी आपले चित्त स्थिर करावे असे वाटू लागते. अशा मनःस्थितीतही जी कोणी व्यक्ती किंवा शक्ती त्याच्या मार्गात येऊन त्याला मार्गदर्शन करते, तिच्याच ठायी नकळत त्याची श्रद्धा दृढ होते. प्रपंचाच्या या सागरांत बुडून असलेले हे मानवी मन सुखाच्या किनाऱ्यावर पोहोचण्याची आस मनात बाळगून या भवसागरातील लाटांवर हेलकावे घेत असते. कित्येकवेळा आपल्या सुखदुःखाचे मोजमाप करून पाहिले तर शेवटी उत्तर एकच की, हे एक क्षणभंगूर आहे. बुद्धीच्या कक्षेच्या पलिकडे साऱ्या गोष्टी जाऊ लागतात, बुद्धीची झेप हे विश्वाचे कोडे उलगडू पहाते, परंतु ती फारच अपुरी पडते. अशावेळी मनाशी एखादी श्रद्धा बाळगूनच समोर असलेल्या दैवी शक्तीला शरण गेल्या-विना गत्यंतरच नसते. यासाठीच मनुष्य कोणत्यातरी शक्तीच्या पुढे नतमस्तक होतो. आपल्या मनांतील रुखरुख या शक्तीसमोरच उघडी करून, त्यातून समा-धान मिळविण्याची धडपड करू लागतो. या माध्यमातून ईश्वराचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु गुळाच्या ढेपेतील प्रत्येक कणांत जशी गोडी खच्चून

भरलेली आहे त्याचप्रमाणे जगांतील प्रत्येक लहानमोठ्या वास्तूत परमात्मा खच्चून भरला आहे याची त्याला जाणीवच नसते.

**माझ्या समाधीची पायरी चढेल**

**दुःख हरेल सर्व त्याचे ।**

या वचनाने, आपल्या भक्तगणांशी एकरूप असलेल्या श्रीसाईनाथांचे देखील अनेक भक्त या भूतलावर आहेत. महाराज एका वरातीबरोबर शिर्डीला आले. वरात खंडोबाच्या देवळाजवळ आल्यावर, म्हाळसापतींची व त्यांची दृष्टादृष्ट झाली. त्यांना पाहिल्याबरोबर उत्कटपणे म्हाळसापतींनी हांक मारली **'आवो साईबाबा'** हे नांव बाबांनी शेवटपर्यंत धारण केले. श्रीसाईबाबांचे नांव कोणाला ठाऊक नाही अशी व्यक्ती या भारत देशांत तरी क्वचितच आढळेल. कित्ये-कांचे आराध्य दैवत असलेले श्रीसाईबाबा, भक्तांच्या हांकेला धावूनच जातात अशी भक्तांची निस्सिम भक्ती आहे. ही व्यक्ती होती तरी कोण? हा अजूनही वादग्रस्त प्रश्न लोकांच्या मनाला भेडसावत असतो. ही व्यक्ती कोण, कोठली किंवा कोणत्या जातीची हा विचार न करता फक्त उत्तर एकच मिळते ते म्हणजे ही एक अत्यंत थोर विभूति होती. साईबाबा जेव्हा शिर्डीत प्रथम आले, तेव्हा त्यांना अनेक प्रकारच्या त्रासातून जावे लागले. परंतु दैवी शक्तीपुढे कोणाचे चालते? ज्यांनी त्यांना त्रास दिला त्यांना या ना त्या तऱ्हेने या सर्व गोष्टींना तोंड द्यावेच लागले. कोणाला जास्त प्रमाणात तर कोणाला कमी. परंतु यालाही बाबांनी दुजोरा असाच दिला की, अरे त्याने तुझे वाईट केले तर त्याचा मोबदला म्हणून तू त्याचे कधीच वाईट करू नकोस, चिंतू देखील नकोस. मनुष्य देह हा एकदाच प्राप्त होतो. त्याचा नीट उपभोग घेण्याचे सोडून नुसतेच वादविवाद करीत बसले म्हणजे देव भेटत नाही. त्यासाठी स्वतःजवळचा अभिमान विस-रायला लागतो — जो काम, क्रोध व मत्सर या सर्वांवर मात करतो तो ईश्व-राच्या समीप जातो.

बाबा रोज द्वारकामाईत बसून लोकांशी थट्टा, विनोद करीत असत. त्यातूनच जीवनांतील एखादे मर्म सहजपणे सांगून जात असत. इथेच बसून लोकांना औषधोपचार करीत, उदी देत, स्वतःला ईश्वराचा बंदा सेवक म्हणून अल्ला भला करेगा, असा आशिर्वाद सतत देत असत. या द्वारकामाईची थोरवी काही आगळीच आहे. बाबा प्रथम या पडक्या मशिदीत रहात असत. तंबाखू

चिलीम, टमरेल हा त्यांचा संसार. अंगावर पायघोळ कफनी व डोक्यास फडका हा बाबांचा पोशाख. समोर अखंड जळत असलेली धुनी, या पडक्या वास्तू मध्येच दक्षिणाभिमुख आसनस्थ वाम हस्त कठड्यावर ठेवून, धुनीकडे पहात बाबा बसत असत. याच मशिदीत चरणी घुंगूर बांधून नाचत असत. गात असत.

**मोठी कृपाळू ही मशिदमाई ।**
**भोळ्या भाविकांची ही आई ।**
**कोणी कसाही पडो अपायी ।**
**करील ही ठायीच रक्षण ।**

शिर्डी क्षेत्री श्रीसाईबाबांनी शेवटपर्यंत वास्तव्य केले. शिर्डी गांवाचा उद्धार केला. बाबा आपल्या भक्तांकडून ज्या गोष्टी करावयाच्या त्या नकळत करवून घेत असत. थोर संतांचे आयुष्यच मुळी, लोकांचा उद्धार करण्यासाठीच असते. त्यांना स्वतःला कशाचीही अपेक्षा किंवा इच्छा नसते. श्रीसाईबाबांचे देहत्यागा-पूर्वी, नागपूरचे परमभक्त श्री. बापूसाहेब बुट्टी, आपल्या परिवारासमवेत शिर्डी येथे वास्तव्य करून राहिले होते. शिर्डीत एक छोटीशी जागा घेऊन, त्यावर एक इमारत बांधून आरामात स्वतंत्रपणे रहावे असे त्यांच्या मनांत आले. एके दिवशी पहाटे बाबांनी बुट्टींना व माधवरावांना स्वप्नात दृष्टांत देऊन, वाडा बांधण्याची आज्ञा केली. तळघर, विहिरीचे काम पूर्ण झाले. त्यावर बाबा नित्यनियमाने लेंडीवर जाताना किंवा परत येतांना देखरेख करीत असत. त्याच-प्रमाणे बांधकामाबद्दल मार्गदर्शन करीत असत. अशाप्रकारे काम पूर्ण होता होता यात एक गाभारा करून मुरलीधराची मूर्ती बसवावी अशी एक गोडशी कल्पना बुट्टींच्या मनात आली, परंतु बाबांचे मनोगत समजल्याविना कोणतेही कार्य करावयाचे नाही हा तर त्यांचा नियम होता. बाबांच्या अनुज्ञेशिवाय कोण-तेही काम ते करीत नसत. हा त्यांचा विचार त्यांनी माधवरावांना बोलून दाख-वला. बाबा लेंडीवरून परत येत असतांना शामरावांनी बापूसाहेबांचे हे मनोगत बाबांना सांगितले. बाबा, बापूसाहेब म्हणतात की, दालनाच्या दोन्ही भिंती पाडून मध्यभागी एक चौक बांधून तिथे सिंहासनावर मुरलीधराची मूर्ती स्थापन करावी अशी त्यांची इच्छा आहे. परंतु बाबा मात्र यावर हसले. वाड्याकडे एकटक पाहून म्हणाले, हे देऊळ पुरे झाल्यावर आपणच इथे वस्तीस राहू. एकमेकांशी बोलू चालू. प्रेमाने एकमेकास भेटू. अशी बाबांची अनुज्ञा झाल्याबरोबर माधव-

रावांनी मुहूर्ताचा नारळ ताबडतोब फोडला व चौथऱ्याचे कामास सुरूवात केली. मूर्ती बनविण्यास कारागिरास सांगितले; परंतु मनुष्य योजितो एक व होते दुसरेच.

श्रीसाईबाबांनी सन १९१८ साली देहत्याग केल्यानंतर, त्यांचे कारकिर्दीत बांधल्या गेलेल्या इमारती किंवा इतर स्थावर जंगमाची व्यवस्था पहाण्याची जबाबदारी कोणीतरी स्विकारणे अत्यंत इष्ट होते. याकरिता सन १९२३ साली श्रीसाईबाबा संस्थान ट्रस्टची स्थापना झाली. अशा प्रकारे सन १९६० पर्यंत हा कारभार वेगवेगळ्या ट्रस्टीच्या हातून हाताळला जात होता. परंतु काही कारणामुळे सन १९६० साली चॅरिटी कमिशनर यांनी संस्थानचा ताबा कोर्ट रिसीव्हरचे ताब्यात दिला. या संस्थानचे पहिले रिसीव्हर होण्याचा मान श्री. क्षीरसागर यांना मिळाला.

त्यानंतर पुढीलप्रमाणे वेगवेगळ्या व्यक्तींची रिसीव्हर म्हणन नेमणूक करण्यात आली.

| | |
|---|---|
| श्री. एस. बी. दर्पे | सन १९६२ |
| ,, बी. जी. पोतनीस | सन १९६४ |
| ,, डी. डी. पाटणकर | सन १९६७ |
| ,, का. सी. पाठक | सन १९७० |

आजही ही रिसीव्हरची कारकीर्द तितक्याच यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. सन १९७८ पासून श्री. क. हि. काकरे हे रिसीव्हर म्हणून या संस्थानचा वाढता, अवाढव्य पसारा यशस्वीपणे सांभाळत आहेत. सेवाधाम, भक्तनिवास व समाधिमंदिरासमोरील खोल्या, तसेच गुरुपादुका स्थानाजवळील खोल्या एवढाच पसारा पूर्वी संस्थानचा होता. या खोल्यांतून येणाऱ्या भक्तांची सोय केली जात असे. दिवसेंदिवस गर्दीचे प्रमाण वाढू लागल्यामुळे गुरुस्थानचे समोरील व भक्तनिवास या इमारतीवर खोल्या वाढविण्याचे काम सुरू झाले व त्याच्याच बाजूला सरंजामे बागेच्या मागे ९० खोल्या असलेली 'शांति निवास, ही इमारत उभारली गेली. एवढ्या खोल्या एकदम वाढल्यामुळे गर्दी आटोक्यात येईल अशी खात्री वाटू लागली. परंतु गर्दीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढू लागले. दिवसेंदिवस वाढणारी गर्दी व जागेचा अभाव लक्षात घेऊनच एकूण ८७,००,०००।— रुपयांची बांधकामे पूर्ण करण्याचा मान रिसीव्हरांचे कारकिर्दीलाच लाभलेला आहे. ही

विशेष व प्रामुख्याने उल्लेख करण्यासारखी गोष्ट आहे. राहण्या जागेचा अभाव लक्षात घेऊनच Dormitories बांधण्याचे काम जवळ जवळ पूर्ण होत आलेले आहे. सन १९७८ अखेर संस्थानतर्फे एकूण रु. १,२१,८८,०८१–८६ किमतीच्या इमारती बांधून पूर्ण झाल्या आहेत.

'फाटके तुटके नेसतो रे, मन मानेल तेथे बसतो रे । वेड्या वेड्यापरी दिसतो रे' । अशी स्थिती असलेल्या या अवलियाने अनेक दीनदुःखितांची, दीनदुबळ्यांची सेवा करण्यात आपला बराचसा काळ घालविला. वेळप्रसंगी ते स्वतः लोकांना औषधपाणी देत असत. ध्येय एकच. त्यांच्यातच खरोखरी ईश्वर-सेवा आहे हे साईबाबांचे व्रत, हा साईबाबांचा वारसा आजही या शिर्डी गावात चालत आला आहे. श्री साईबाबा संस्थानतर्फे एक हॉस्पिटल चालविले जाते. अनेक ठिकाणहून लोक येतात व बरे होऊन जातात. मोठमोठे डॉक्टर्स येऊन रुग्णांची सेवा करण्याचा लाभ घेतात. या ठिकाणी बाबांच्या 'रुग्ण सेवा हीच ईश्वरसेवा.' या वचनाचा खराखुरा प्रत्यय येतो. सर्व साधनसामुग्रीनी सुसज्ज असलेल्या हॉस्पिटलमध्ये लहान मुलांसाठी वॉर्ड तसेच स्पेशल खोल्याही आहेत. दरवर्षी भरणाऱ्या नेत्रशिबिराचा सुमारे ४०० ते ५०० लोक फायदा घेतात.

सन १९८१ मध्ये अंदाजे २,००,०००।– ची अनेक आधुनिक उपकरणे संस्थानतर्फे परदेशाहून मागविण्यात आली त्यात लॅप्रोस्कोप, सिस्टोस्कोप, व्हॅलिलॅब इ. उपकरणांचा समावेश आहे. तसेच नेत्रशिबिराप्रमाणे Laproscopie Camp, Orthopaedic camp, Healthy Baby cantest, Muslim Vascoetomy camp, इ. वेगवेगळ्या गोष्टी संस्थानमार्फत सादर केल्या गेल्यामुळे, अहमदनगर जिल्ह्यात साईनाथ हॉस्पिटल नावारूपास आलेले आहे. ही विशेष उल्लेख करण्यासारखीच बाब आहे. जेवढ्या सोयी जास्त, तेवढी गर्दी जास्त. ४८ कॉटस् असलेले हॉस्पिटल आता रुग्णांना अपुरे पडू लागले, आहे. यावर आणखी खोल्या बांधण्याचे काम जवळ जवळ पूर्ण झाले आहे.

वाढत्या व्यापाबरोबर संस्थानच्या कर्मचाऱ्यांच्या संख्येतही वाढ करणे प्राप्तच आहे. कर्मचाऱ्यांची राहण्याची, त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाची सोयही तितक्याच काटेकोरपणे उपलब्ध करून देण्यात आली आहे. दरवर्षी संस्थानतर्फे गरजू विद्यार्थ्यांना सुमारे रु. २,५०,०००।– पर्यंत स्कॉलरशिप देण्यातही संस्थानने यश संपादन केले आहे

मी माझिया भक्तांचा अंकिला ।
आहे पाशिच उभा ठाकला ।
प्रेमाचा मी सदा भुकेला ।
हाक हाकेला देत असे ॥

बाबांच्या हंडीचा थाट काही निराळाच. मशिदीतच मोठी चूल रचून त्यावर पातेले ठेवित असत. काही मिठे चावल बनवित तर काही मांसमिश्रित पुलाव. काही कणिकेची मुटकूळी तर कधी कणिकेचा रोडगा. कधी लहान हंडीत तर कधी मोठ्या हंडीत स्वयंपाक शिजवून भक्तांना वाढीत असत. बाबा स्वत: अन्न शिजवून वाढीत असत. स्वत: मसाला वाटून पदार्थ अधिकाधिक चविष्ट करीत असत. हे अन्न खाण्यासाठी बाबा आग्रह करीत नसत. परंतु भक्तच ते प्रसाद म्हणून ग्रहण करीत. भक्त कितीही असोत अन्नाचा तुटवडा कधीही नसे याची प्रचिती आजही संस्थानचे भोजनगृहात येते. भक्त उन्हातान्हात तळपत तासन्तास उभे रहातात परंतु भोजनगृहात जेवण्याचा हट्ट मात्र सोडीत नाहीत. बाबांच्या प्रसादाचे ग्रहण करणे हीच एक भावना त्यांच्यात असते.

दिवसेंदिवस वाढत्या गर्दीबरोबर व्यापही वाढला. सन १९५० साली बांधलेले दीक्षित वाड्यातील भोजनगृह अपुरे पडू लागले. ही भक्तांची गैरसोय लक्षात घेऊन दि. २५–७–८० रोजी मा. एन्. के. पारेख हायकोर्ट जज्ज यांचे हस्ते नवीन भोजनगृहाचे उद्घाटन करण्यात आले. एकावेळी १००० लोकांची जेवण्याची सोय करण्यात आली. उन्हाळ्यात लोकांना त्रास होऊ नय याची जास्तीत जास्त काळजी घेण्याचा संस्थानने प्रयत्न केला असून, जेवण्यास येणाऱ्या भक्तांसाठी प्रतिक्षा हॉलचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे. एका लहानशा खेडेगावात असूनही भोजनगृह, ताक करण्याचे मशिन, चटणी मशिन, चपाती मशिन, बटाटे सोलण्याचे मशिन, कणिक मळण्याचे मशिन इ. साधनसामुग्रीनी सज्ज आहे. तसेच चपात्या भाजण्यासाठी इलेक्ट्रीकच्या शेगड्यांचीही सोय करण्यात आलेली आहे.

सर्व सुखसोयींनी जास्तीत जास्त परिपूर्ण असलेल्या साईबाबा संस्थानच्या परिसरात काही तरी कमी आहे. ही खंत भूतानचे एक निस्सीम साईभक्त श्री. ए. आर. कॉन्ट्रॅक्टर यांचे मनात होती. या परिसरात लग्नकार्यादि समारंभासाठी एखादे मंगल कार्यालय बांधावे अशी त्यांची उत्कट इच्छा होती. ती साईबाबांनी

पूर्ण केली. त्यांनी आपल्या मातोश्रीच्या स्मरणार्थ एक मंगल कार्यालय बांधून दिले. परंतु दिवसेंदिवस वाढत्या गर्दीमुळे हे कार्यालय अपुरे पडू लागले. व म्हणूनच श्री. कॉन्ट्रॅक्टर यांनी दुसरा मजला वाढविण्यासाठी रु. २,००,०००।– देणगी रूपाने देऊन, संस्थानच्या भरभराटीला हातभार लावला. श्रीसाईबाबा संस्थानचे मंगल कार्यालय म्हणजे–शिर्डीसारख्या ग्रामीण भागातील एक उत्कृष्ट व अत्यंत उपयुक्त अशी वास्तू आहे. आजूबाजूच्या परिसरातील सर्व लोकांसाठी ही एक उत्कृष्ट सोय झालेली आहे. रु. २५० अनामत रक्कम घेऊन मंगल कार्यालय भाडयाने देण्यात येते. तळमजल्याचे भाडे रु. १५०।– व पहिल्या मजल्याचे भाडे रु. ७५ अशा प्रकारे कमी दरात ग्रामीण विभागातील लोकांच्या अडचणी लक्षात घेऊन भाडयाची आकारणी करण्यात संस्थान अद्याप यशस्वी ठरले आहे. ही एक अत्यंत अभिमानाची बाब आहे.

संस्थानचे विद्युतगृह ही देखील एक फार मोठी बाब आहे. संस्थानचे हद्दीतील सर्व इमारती भोजनगृह तसेच हॉस्पिटल, यांना इलेक्ट्रीसीटी बोर्डाकडून मिळ-णारा विजप्रवाह काही कारणाने खंडित झाला, तर संस्थानचे जनरेटरवरून या सर्व इमारतींना वीजपुरवठा करण्याचे कामी संस्थानचे विद्युतगृहांतील कर्मचारी वर्ग तत्पर असतो. तसेच येणाऱ्या भक्तांना, मंगल प्रभाती सनईचे सूर किंवा भक्तीगीतांची बहार करून त्यांचा आनंद व उत्साह द्विगुणित करण्याचे महान कार्यही संस्थान विद्युतगृहांतील कर्मचारीच करीत असतात.

साईबाबा संस्थान हे महाराष्ट्रातील एक अत्यंत नामवंत-असे देवस्थान असून, भारतातूनच नव्हे तर परदेशातूनही अनेक लोक बाबांच्या दर्शनास येत असतात. या गर्दीचा येणाऱ्या लोकांच्या संख्येचा आढावा, संस्थानच्या वाढत्या उत्पन्ना-वरून सहज लक्षांत येतो. माहे डिसेंबर १९८३ चे दक्षिणापेटीतील एकूण रक्कम रु. ५,५०,०००।– पाहाता, याची कल्पना येते. येथे अनेक प्रकारची वेगवेगळया जातीची तसेच धर्माची भक्त मंडळी येतात, भक्तिभावाने बाबांचे दर्शन घेऊन जातात. कोणी मुक्काम करतात तर कोणी दर्शन घेऊन मानसिक समाधान मिळ-वून जातात. अनेक कारणाकरिता, बाबांजवळ मागणे मागायला, तर कोणी देणे द्यायला बाबांच्या चरणी येतात. मनःशांति अनुभवतात.

या सर्व भक्त मंडळींची जास्तीत जास्त रहाण्याची सोय पहाणे हे संस्थान आपले कर्तव्य समजते. या करिताच वेगवेगळया तऱ्हेच्या अनेक खोल्या बांधून

संस्थानने ही गैरसोय दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. ही कामगिरी संस्थानचे बांधकाम खाते बजावित आहे. मोठमोठे हॉल (Dormitories) बांधून जास्तीत जास्त भक्तांची राहण्याची सोय करण्यात संस्थान यशस्वी ठरले आहे.

भक्तांची राहण्याची सोय फक्त इमारती बांधून पूर्ण होत नाहीं तर त्या-बरोबर त्यांच्या काही प्राथमिक गरजाही असतात. त्यांना झोपण्यासाठी गाद्या, पांघरूण, इ. सोय करणेही महत्त्वाचे आहे. ही सर्व कामगिरी अत्यंत चोखपणे पार पाडण्याचे कार्य चौकशी ऑफिसमधील कर्मचारी करतात. भक्तांची नांवे नोंदवून घेण्यापासून ते त्यांना भांडी, गाद्या, चादरी उपलब्ध करून देऊन, ते परत जाण्याच्या वेळेस त्यांची घेतलेली अनामत रक्कम परत करण्यापर्यंतची सर्व कामे संस्थान चौकशी कार्यालयांतील कर्मचारी वर्ग करीत असतो.

एवढ्या मोठ्या संस्थेत भक्तांची सतत ये जा चालूच असते. त्यांच्या रहाण्या-बरोबर स्वच्छता चोख राखणे ही एक जबाबदारीच आहे. ही जबाबदारी पार पाडण्याचे कार्य संस्थानचे स्वच्छता कामगार चोखपणे पार पाडीत असतात. जिथे स्वच्छता उत्कृष्ट आहे अशा ठिकाणी आरोग्यही राहते

बाबांची काकड आरती, स्नान, अभिषेक, पूजा इ. सकाळचे सर्व कार्यक्रम आटोपून दुपारचे आरतीपर्यंत मध्ये काहीवेळ मोकळा मिळतो. हा वेळ सत्कारणी लागावा यासाठीच संस्थानतर्फे एक वाचनालय चालविण्यात येते. यांत बाबांच्या जीवनावर लिहिलेली सर्व पुस्तके विक्रीस ठेवली असून बाबांचे सर्व प्रकारचे फोटो-ही विकत मिळतात.

बाबांनी अन्नग्रहण केले नाहीं तर भक्तही अन्नग्रहण करीत नसत, ही परंपरा आजही चालत आलेली आहे. बाबांचे नैवेद्य, कोठीतील प्रसाद प्रथम द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान व मंदीर येथे पाठविल्यानंतरच भक्तांना कुपन्स दिली जातात.

रहाण्याबरोबर सुरक्षिततेची जबाबदारी आलीच. ही जबाबदारी पार पाडण्याचे कार्य संस्थानचे संरक्षण खाते करते.

रहात्यासी बाबा जेव्हा जात ।<br>
झेंडू जाई जुई आणीत ।<br>
नीजहस्ते उरवरी लुपसीत ।<br>
पाणीही घालीत नेमाने ॥

बाबा स्वतः झाडांना पाणी घालीत असत. तात्यांना सांगून बाबा कच्चे घडे आणवित. विहिरीतून स्वतः पाणी काढून, आपले खांद्यांवर वाहून आणून झाडांना घालीत असत. असा हा बाबांचा उपक्रम चालू असे आजही बाबांनी तयार केलेली लेंडी बाग अनेक फुलझाडांनी सुशोभित करण्याचे काम बगिच्याचे माळी करीत आहेत.

नागपूरचे परमभक्त **बापूराव बुट्टी** यांच्याशी बाबा वचनबद्ध होते. आम्ही या वाड्यात येऊन राहू, एकमेकांशी बोलू, चालू प्रेमाने एकमेकास भेटू असे आश्वासन बाबांनी त्यांना दिले होते. त्यामुळेच मुरलीधराच्या मूर्तीच्या जागी आज बाबांची समाधी व पुतळा ठेवलेला आहे. भक्तजन येतात त्यांचे दर्शन घेतात व मानसिक समाधान मिळवून जड अंतःकरणाने घरी जातात.

बाबांचे समाधि मंदिर या नांवाने ओळखला जाणारा हा बुट्टीवाडा भक्तगणांनी फुलून जातो. भक्तगण इथेच बसून अभिषेक पूजा करतात. आरतीला हजर राहून भारावून जातात. देहभान हरपून आपल्या लाडक्या देवतेचे दर्शन घेतात. ही सर्व भक्तांची देखरेख करण्याचे कार्य, मंदिर विभागाकडे सोपविण्यांत आले असून यातील कर्मचारीवर्ग भक्तांना पूजाअर्चा वगैरे करण्याबाबत सतत मार्गदर्शन करीत असतो.

संस्थानचा एवढा मोठा डोलारा सांभाळणे ही काही मामुली बाब नव्हे. इथे अनेक थरांतील, धर्मातील लोकांची ये जा सतत चालूच असते. प्रत्येक खात्यातील कर्मचारी आपापल्या परीने कार्यमग्न असतात या सर्वांचे कार्य चोखपणे चालले आहे किंवा नाहीं, यावर देखरेख करण्याची महत्वाची कामगिरी करते संस्थानचे मुख्य कार्यालय भक्तांच्या अडीअडचणी तक्रारी समजून घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यांत मुख्य कार्यालयांतील कर्मचारी तत्पर असतात.

आज संस्थानची भरभराट पाहिली की इथे येणाऱ्या भक्तगणांच्या गर्दीचा व त्यांच्या भावनेचा प्रत्यय येतो. जेवढ्या सोयी उपलब्ध जेवढी उत्तम व्यवस्था त्यांचेच उत्तर म्हणेज दिवसेंदिवस वाढणारी गर्दी हे होय. असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. निधर्मी भारताचे माजी राष्ट्रपती मा. संजीव रेड्डी यांनी दोन वेळा संस्थानला भेट दिलेली आहे, याशिवाय अखिल भारतातले नावाजलेले अधिकारी देशी परदेशी असंख्य नागरिक सतत भेट देत असतात यावरून बाबांच्या संस्थानची थोरवी जगत्मान्य झालेली दिसून येईल.

दिवसेंदिवस वाढणाऱ्या गर्दीचा आढावा घेऊनच काही सूचना श्रीसाईनाथांच्या भक्तांना कराव्यात अशी कल्पना अधिकारी वर्गाला सुचली व यांनी ती अंमलात आणली.

**सूचना :-**

१) शिर्डीस पोहोचल्यावर चौकशी कचेरीत खोली बद्दल चौकशी करा व योग्य माहिती देऊन नांव नोंदवा.

२) खोलीत सामान ठेवून कुलूप लावल्याशिवाय कोठेही जाऊ नका.

३) सार्वजनिक हॉलमध्ये जागा मिळाली तर तुमचे सामान, चीजवस्तू सांभाळण्याची काळजी घ्या. सामानाजवळ आपला एक जाणता माणूस बसवून मगच इतरत्र जा. कदाचित चोर मागावर असू शकतील.

४) स्नानगृहाबाहेर येताना पैशाचे पाकीट, दागिने हातातील घड्याळ, कपडे, भांडी वगैरे बरोबर घेण्यास विसरू नका.

५) रोख रक्कम व दागिने सुरक्षित ठेवण्यासाठी चौकशी **कार्यालय** प्रमुखाकडे चौकशी केल्यास लॉकर मिळेल. ही सेवा विनामूल्य राहिल. फक्त डिपॉझिट ठेवावे लागेल.

६) श्रींचे आरतीचे वेळी लोटालोटी होते. त्यावेळी ,आपल्या मुलांना सांभाळा व आपल्या खिसा पाकिटावर लक्ष ठेवा. अंगावरील दागदागिने सांभाळा. अंगावर दागिने असलेल्या आपल्या लहान मुलांना एकटे सोडू नका.

७) श्रींचे ऑफिसशिवाय कोणत्याही इतर ठिकाणी अगर कोणाच्या हातात पैसे देऊ नका. **धर्मकृत्य फक्त संस्थेमार्फत करावे.**

८) श्रींचे ऑफिसात धर्मकृत्य देणगीबाबत पैसे दिले अगर वस्तू भेट दिली तर त्याची पावती अवश्य मागून घ्या.

९) श्री साईबाबा संस्थानचा इतर ठिकाणी श्रीसाईबाबांचे नावावर चाललेल्या संस्थांशी काहीहि संबंध नाहीं.

१०) श्रींचा कोणी शिष्य नाही अगर वारसदार गादीवर बसलेला नाहीं. अगर मध्यस्थी नाही. कोणी श्रींच्या पेहरावासारखा पेहराव केला म्हणून विश्वास ठेवू नका.

११) मार्गदर्शकाचे सोंग करून काही अपरिचित माणसे स्टँडपासून आपला पाठलाग करतात, शिर्डीची स्थळे दाखविण्यासाठी ओळख करून घेतात, गोड गोड बोलतात, अशा माणसांवर विश्वास ठेवू नका, अशा माणसांकडून फार मोठी फसगत होते, त्यांचेमार्फत व्यवहार केल्यास अगर फळ दुकानदार व कमिशन एजंट मार्फत व्यवहार केल्यास नुकसान भरपाईस संस्थान जबाबदार रहाणार नाहीं.

१२) श्रींचे नावावर काही माणसे जंतरमंतर वागांदोरा करणारे मांत्रिकतांत्रिक म्हणून फिरत असतात त्यांचे पासून सावध रहा.

१३) श्रींचे नावावर चालू असलेल्या साखळी पत्रास अजिबात महत्त्व देऊ नका.

१४) श्रींचे बाबतीत आधारभूत माहिती कार्यालयात विचारावी इतरांवर विश्वास ठेवू नका.

१५) आपली काही तक्रार असल्यास मुद्दाम सोयीसाठी ठेवलेल्या नोंद पुस्तकात नोंदवा. आपले पूर्ण नाव व पत्ता नोंदविण्यास विसरू नका.

१६) भक्ताने देणगी पोष्टाद्वारे पाठविताना पाकिटात रक्कम (रोख अगर नोटा, नाणी) पाठवू नयेत. देणगी पाठविताना म. ऑ. रेखांकित चेक, डिमांड ड्राफ्ट अगर आ. पी. ओ. द्वारे पाठवाव्यात.

**श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी येथे होणाऱ्या पूजा वेळ व दर.**

| | |
|---|---|
| १) आरती (काकड) | सकाळी ५–१५ |
| २) श्रींना मंगल स्नान | सकाळी ६–०० |
| ३) श्रींना अभिषेक पुजा | सकाळी ७–३० ते ११–०० |
| ४) सत्यनारायण पूजा | सकाळी ९–०० |
| ५) मध्यान्ह आरती | दुपारी १२–०० |
| ६) पुराण प्रवचन (साईचरित्र अध्याय वाचन) | दुपारी ४–०० |
| ७) धुपारती | सायंकाळी सूर्यास्ताचेवेळी. |
| ८) भजन गायन | रात्री ९ ते १० |
| ९) शेजारती | रात्री १०–०० |

श्रींना प्रसाद, फुले वा अन्य वस्तू अर्पण करणे असल्यास भक्तांनी सकाळी सात वाजेनंतर व शेजारती पूर्वी कराव्यात.

पालखीची मिरवणूक दर गुरुवारी रात्रौ ९–१५ वा. निघून समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी करून समाधि मंदिरात रात्रौ १०–०० वाजता परत येते. मंदिराचे नियमानुसार रात्री शेजारती नंतर मंदिरात कोणतेही कार्यक्रम होत नाहींत. त्यानंतर मंदिर दुसरे दिवशी पहाटे पाच वाजेपर्यंत बंद राहते.

कलाकार भक्तांना श्रींचे समाधिपुढे हजेरी देण्याची इच्छा असल्यास तसेच भक्तांना फोटो घेण्याचे असल्यास त्यांनी संस्थान अधिकाऱ्यांची आगाऊ परवानगी घ्यावी.

पूजेची ताटे सकाळी सात वाजेनंतर स्विकारली जातात. मंदिरात होणारे नित्य नियमित कार्यक्रमाचे व सभासदत्व शुल्क खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| १) अभिषेक प्रत्येक | ५० पैसे ति. विक्री सकाळी ७ ते ११ |
| २) नैवेद्य | ५० पैसे सर्व अभिषेक व सत्यनारायण. |
| ३) सत्यनारायण | १०–०० रु. पूजा मर्यादित स्वरूपात |
| ४) सभासद वर्गणी | |
| अ. सामान्य सभासद | ५–०० रु. |
| ब. आजीव सभासद | रु. १०० ते ४९९ पर्यंत इच्छे-नुसार (तहहयात) |
| क आश्रयदाता | रु. ५०० किंवा जास्त (तहहयात) |
| ५) साईलीला मासिक (मराठी व हिंदी–इंग्रजी) | वार्षिक वर्गणी रु. १०–०० |

साईलीला आजीव सभासद वर्गणी रु. ३००–००

वर उल्लेख केलेल्या सोयी खेरीज अनेक योजना संस्थानने हाती घेतलेल्या आहेत.


श्रीसाईबाबा संस्थानची अशीच उत्तरोत्तर भरभराट होवो व मनःशांतीसाठी साई दर्शनास येणाऱ्या भक्तांची जास्तीत जास्त सुव्यवस्था करण्याची व्यवस्थापनाला संधि मिळो, हीच साईचरणी प्रार्थना.



श्री साईलीला १० व्या लेखक-कवी संमेलनाचे अध्यक्ष

# श्री लक्ष्मणराव सदाशिवराव नाईक

—श्री. जी. के. उर्फ बापूसाहेब निरखे, इंदूर



श्रीसाईबाबा संस्थान शिरडी या आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त देवस्थान, क्षेत्रस्थानचे मुखपत्र श्री साईलीला (मराठी इंग्रजी–हिंदी) या सुप्रसिद्ध मासिकाच्या लेखक कवींचे दहावे वार्षिक स्नेहसंमेलन सालाबाद प्रमाणे यंदाही रविवार ता. २९ व ३० जानेवारी १९८४ रोजी शिरडीस अतीव उत्साहाने व आनंदाच्या वातावरणात भरविण्यात येत आहे. आमचा आता पर्यंतचा प्रघात असा आहे की या संमेलनाचे अध्यक्षपद अशा व्यक्तिस दिले जाते की ज्याने श्री साईनाथांना त्यांच्या हयातीत पाहिलेले आहे, त्यांचे दर्शनसुख घेतलेले आहे, त्यांचा थोडा बहुत सहवास लाभलेला आहे. आमचा या प्रथेला अनुसरून या संमेलनाचे अध्यक्षपद यंदा इंदूर येथे स्थाईक झालेले श्रीमान लक्ष्मणराव सदाशिवराव नाईक यांना स्वीकारण्यास रितसर विनंती करण्यात आली व त्यांनी मोठ्या आनंदाने ती मान्य केली.

श्रीसाईलीला लेखक कवींची वार्षिक संमेलने शिरडीस होतात त्याबद्दलचे अहवाल श्री. नाईक साहेबांनी यावेळी अनेकदा श्रीसाईलीलातून वाचले होते पण आपण काही श्रीसाईलीला लेखक किंवा कवी यापैकी कुणीच नाही मग आपल्याला तिथे कसे काय जायला मिळणार असे श्री नाईक यांना वाटत असे. पण यंदा मोठ्या योगायोगाने त्यांच्या अंतरिक इच्छेनुसार त्यांना या ठिकाणी संमेलनाचे अध्यक्षपद श्रीसाईबाबांनींच दिले आहे असेच म्हणावयास हवे.

शिरडीत समाधी मंदिरात श्री बाबांच्या वेळेपासून भक्तमंडळींची जी छायाचित्रे किंवा तसबिरी लटकवलेल्या आहेत त्या पैकी हरदयाचे श्रीसद

भैय्या नाईक यांची पण तसबिर आहे. त्यांचे लक्ष्मणराव हे क्रमांक दोनचे सुपुत्र होत.

त्यांचा जन्म हरदा (मध्यप्रदेश) येथे १४ जानेवारी १९०७ रोजी झाला. त्यांचे वडील हरदयाला शेती मालगुजारी करीत असत. वडलांना संत, महंत साधू संत पुरूष यांचे बद्दल अतिशय जिव्हाळा असायचा. त्या काळात त्यांना श्रीगोंदवलेकर महाराजांचे दर्शन हरदयाला झाले होते. केव्हा केव्हा त्यांचा वडलांच्या अंगात पिशाच्याचा संचार होई व त्यासाठी उपाय म्हणून महाराजांनी त्यांना गाणगापूरहून जाण्यास सांगितले होते, व ते तिथे गेल्याने त्यांची पिडा निवारण झाली. श्रीवासुदेवानंद सरस्वतींचा दर्शन प्रसाद वडलांना लाभलेला होता.

संतांची अशी कृपा असलेल्या अशा या घराण्यात लक्ष्मणरावांचे बाळपण सुखात गेले. त्यांचे शिक्षण मिडल स्कूल पर्यंत हरदयास झाले. पुढे १९२७ साली पुढील शिक्षणासाठी ते इंदूर मुक्कामी आपल्या बहिणीकडे आले. तेथल्या सुप्रसिद्ध ख्रिस्चन कॉलेजातून त्यांचे इंटर पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले.

वडील श्रीसदशिवरावांचा श्रीसाईबाबांशी संबंध इ स. १९१३-१४. सालापासून सुरु झाला. वारंवार शिरडीला ते काहीना काही कारण काढून यायचे. एकदा बाब.चे शामा देशपांडे काही कामा निमित्त हरदयाला आले असताना. सदाशिवरावांचे आईने त्यांच्या जवळ तक्रार केली की हा संसारी माणूस उठ सूट शिरडीला धावतो. तेव्हा तात्काळ शामाने त्यांना सांगितले की, यापुढे तुम्ही शिरडीला यावयाचे नाही जणू हा बाबांचा आदेश आहे असे समजाना बाबांना वाटले, तेव्हा ते तुम्हाला पत्र टाकून बोलावतील पण १९१३ ला शामाचेच पत्र आले की साईबाबांनी तुम्हाला बोलावले आहे म्हणून. तेव्हा सदाशिवराव शिरडीस आपल्या सर्व कुटुंब परिवारासकट मुलाबाळासह गेले. तेव्हा छोट्या लक्ष्मणरावांचे वय अवघे साडेपाच वर्षाचे होते. यावेळी त्यांना बाबांचे अगदी जवळून दर्शन पूजन मिळाले व उदी प्रासादाची पण मूठ मिळाली. त्यांचे वडील साईबाबा जवळ त्यांचे मित्र श्री प्रुळकरांचे बरोबर तासनतास बसायचे व मग अशा वेळी छोटे लक्ष्मणराव व त्यांचे बंधू बाबांकडे सारखे टक लावून पहात बसावयाचे.

यानंतर १९१४-१५ साली लक्ष्मणरावांना शिरडीला जाण्याचा पुन्हा योग आला यावेळी त्यांचे वय चांगले सात आठ वर्षाचे होते. वडील ते व

त्यांची बहिण एवढीच शिरडीला त्या वेळी आली होती. या भेटीत मात्र त्यांना बाबांच्या चरणावर मस्तक ठेवून नमस्कार करण्याची संधी मिळाली. बाबांचे संभाषण ऐकण्यास मिळाले. उदी प्रसाद मिळे पर्यंत ते बाबांच्या पायाशी अक्षरशः बसून राहत. इतक्यात बाबा कुणावर जर काही रागावले, ओरडले की हे किशोर लक्ष्मणरावही घाबरून जाऊन मान खाली घालून तोंड झाकून घेत असत. चावडीला जातांना राधा कृष्णामाई त्यांचे कपाळावर, गालावर गंधाची टिंबे लावावयाची हे तर लक्ष्मणरावांना आज चांगलेच आठवते.

आपल्या लहानपणाची एक आठवण श्री. लक्ष्मणराव सांगतात, लक्ष्मण-रावांचे वडील सदाशिवरावांना एकदा खूप गरीबीचे दिवस आले. घरात त्यांच्या दाणा पण नव्हता तेव्हा आता शिरडीला चलावे म्हणून त्यांचे मित्र त्यांना सांगण्यासाठी घरी आले. बाबारे मजजवळ गाडी भाड्यासाठी दिडकी पण नाही. परूळकर त्यावर म्हणाले, "मी देतो भाडे चल." तेव्हा वडील म्हणाले, "दे पैसे मी इथच राहतो व गुरू पौणिमेची पूजा करतो." पण इतक्यात साई बाबांचे देशपांडेंनी लिहिलेले पत्र आले त्या पत्रात परूळकरांनी शिरडीला तर यावेच पण येतांना सदूभैय्यानापण घेऊन यावे असे लिहीले होते म्हणून केवळ बाबांच्या शद्वाखातर हे दोघे शिरडीला गेले. श्री. साईबाबांनी इ. स. १९१५ साली दासनवमीला मुक्ताराम व बाळकराम या आपल्या दोन भक्त सेवकांचे बरोबर नाईक घराण्याचे घरी चावडीत जसा बाबांचा मोठा फोटो आहे अगदी तस्साच एक फोटो पाठविला. आजही ती तसबीर या घराण्यात असून तिची यथोचितपूजा अर्चा होत असते.

श्री. लक्ष्मणराव उर्फ बाळासाहेबांचा विवाह १९४३ साली झाला. तब्बल ३५ वर्षे संसार सौख्य त्यांनी उपभोगले. त्यांच्या पत्नी सौ. मालतीबाई १९७८ मध्ये दिवंगत झाल्या श्री. बाळासाहेबांना विश्वनाथ (वय ३५) व श्री. धनंजय (वय २५) असे दोन पुत्र असून एक कन्या कु. वनिता वय वर्षे ३० ची आहे. सून सौ. गिरीजेस दोन अपत्ये आहेत. लक्ष्मणरावांचे मुंजी साठी शिरडीहून श्रीमान दीक्षित, . देशपांडे व तात्या कोते हे मुद्दाम शिरडीहून आले, होते व त्यांनी ५ रू. बाबांची भिक्षावळ घातली व सावित्री भजन माला हे पुस्तक ते भेट देऊन गेले.

श्री. नाईक यांनी इंदूर हायकोर्टात नोकरी इमाने इतबारे केली. तेथून ते सेवा निवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी माया ट्रेडिंग सिंडीकेट नावची फर्म

स्थापन केली. कॅमल इंकची एजंसी ते व त्यांचे चिरंजीव तिथे पहातात. शिवाय होमिओ पंथीचा त्यांचा पारमार्थिक व्यवसाय आहे.

श्री. नाईक यांचे वय आज ७६ वर्षांचे आहे. त्यांची रहाणी अगदी साधी असून ते या वयातही निर्व्यसनी आहेत. इंदूर शहरातल्या धार्मिक सामाजिक व साईसेवेच्या सर्व कामात ते अग्रणी असतात. श्री. साईलीलाचे दशकमहोत्सवी संमेलन श्री. लक्ष्मणरावांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीपणे पार पडो अशी श्री साई चरणी प्रार्थना करतो.

★

श्रीरामनवमी विशेषांक

१ एप्रिल १९८४ रोजी थाटात प्रकाशित होईल मुखपृष्ठावर श्रीबाबांचे मनमोहक चित्र व प्रसंगोचित लेख नि कविता.

पृष्ठे ६४) (किंमत १ रु.

खास उदी विशेषांक

१ मे १९८४ रोजी भक्तांच्या हाती पडेल. श्री बाबांच्या उदीरूपी संजीवनीच्या आश्चर्यकारक भक्त अनुभव लेखांनी भरगच्च अशा प्रती खास अंक

पृष्ठे ६४) (किंमत १ रु

# साईलीला लेखक–कवी संमेलनाची दहा वर्षांची वाटचाल

स्थान – तीर्थ क्षेत्र शिरडी, १९७५ ते१९८४.

| वर्ष | माननीय अध्यक्ष | सध्या हयात |
|---|---|---|
| १) १८–१९ जानेवारी १९७५ | श्री. एन. पी. उर्फ काकासाहेब अवस्थी, पुणे | हयात नाहीत |
| २) १९७६ – | डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर, कुर्ला मुंबई | हयात आहेत |
| ३) १९७७ – | श्री. अनंत जयदेव उर्फ दादासाहेब चितांबर, अहमदनगर | हयात आहेत |
| ४) १९७८ – | श्री. गणेश जयदेव उर्फ आप्पासाहेब चितांबर, अहमदनगर | हयात आहेत |
| ५) १९७९ – | डॉ. गजानन गोविंद उर्फ अण्णासाहेब दाभोलकर, बांद्रा | हयात आहेत |
| ६) १९८० – | श्रीमंत अनुबाई वहिनी साहेब घोरपडे इचलकरंजीकर, कोल्हापूर | हयात आहेत |
| ७) १९८१ – | सौ. सरोजिनी भास्करराव मुळये, इंदूर (श्री. काकासाहेब महाजनींच्या कन्या) | हयात आहेत |
| ८) १९८२ – | श्री. दत्तात्रय दामोदर उर्फ नानासाहेब रासने पुणे | हयात आहेत |
| ९) १९८३ – | डॉ. श्री. राजाराम सिताराम कापडी, कोल्हापूर | हयात आहेत |
| १०) १९८४ – | श्री. लक्ष्मण सदाशिव नाईक | विद्यमान अध्यक्ष |

११) संमेलनाची मुहूर्तमेढ –मा. रिसिव्हर श्री. का. सी. पाठक साहेब

१२) संमेलनाला गती देऊन परंपरा कायम ठेवली – मा. रिसिव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब

१३) संमेलनाचे गेली दहा वर्षे कार्यवाह – डॉ. श्री. दि. परचुरे सदानंद चेंदवणकर

---

प्रार्थना साई तुला ही
तू सदा जवळी रहा।



मी जेथे जाईन तेथे
प्रेम दृष्टीने पहा ॥



# कुणीतरी जाऊनी सांगा

(चाल :- हम तो तेरे आशिक - फि. फर्ज.)

श्री. स्वामी संजयानंद बद्रीनाथ हृषिकेश, हिमालय.

कुणीतरी जाऊनी सांगा निरोप साईला
भक्त तुझा येऊनी राहिला शिरडीला
सांगू कुणाला मी सांगू कुणाला..... "ध्रु"

किती दिवस वाट पहातों
तुझ्या साठी हा जीव झुरतो
संसारी ध्यापलो मी जीव हा नकोसा झाला
धीर धरवेना साई आतां माझ्या मनाला
सांगू कुणाला मी सांगू कुणाला .... ॥ १ ॥

गोकुळीचा तो सावळा श्याम
तसा तू माझा साई घनश्याम
जाऊ मी कशाला आता काशी गयाला
संजय म्हणे चारी धाम माझे शिरडीला
सांगू कुणाला मी सांगू कुणाला.

# श्रीबाबांचे दळण–(फटका)

**********************

(प्रस्तावना : श्री बाबांनी स्वतः गव्हाचे दळण करून त्या गव्हाचे पीठ गावच्या सीमेवर टाकावयास सांगितले व तेव्हां पासून शिर्डीमधील महामारीचा उपद्रव कायमचा नाहीसा झाला. श्री बाबांच्या दळणाचा अध्यात्मिक अर्थ सांगणारा श्री बाबांचा फटका–सटका (पारमार्थिक उपदेश) पुढील प्रमाणे रचला आहे.)

पुढे जाई तू नित्य साधका मागे वळूनी पाहू नको
फुकट खाऊ या रांडा सिद्धी त्यांच्या मागे लागू नको
विवेक अभ्रू देह धनासी गृहसौख्यासी नासविती
विकून खाती सर्वस्वासी मायाजाळी नच मुक्ती
अहंभाव अज्ञात तयांचे बाप तयांचे कर्ज नको
या देहातिल सत्वभाव नित जागृत ठेवी दुजे नको
आत्मज्ञान मिळवून मोक्ष या अंतिम साध्या विसरू नको
ज्ञानकर्मयुत भक्तीने तू सत् धर्मासी सोडू नको
सत्व गव्हाचे पोते तव हे संचित त्याचे नांव असे
जन्ममृत्यूच्या भोवऱ्यात तुज गुंतवुनी ते ठेवितसे
भाव भाबडा मज प्रिय तरी कर्मयुक्त ज्ञानी होई
'असा मार्ग हा परमार्थाचा चाल' सांगती प्रभूसाई
काळाचे भय प्राणघात हो उपजवितसे महामारी
तव कर्मांनी बांधियले तुज नित्यच तुजला या शरिरी
असे गव्हाचे पोते संचित भरलेले जन्मोजन्मी
प्रारब्धच हा भाग तयाचा सुपात घेई मापूनी
या जन्मी तू जे जे करिसी होते संचित क्रियमाण
पुण्यकर्म तव ज्ञान अग्निचे तेज करितसे भक्षण
ज्ञान मिळवुनी निर्बिज करणे करणे कर्म अग्निला समर्पण
ब्रम्हपदी तू जाता तुजला नाही जन्म पुन्हा मरण
प्रारब्धाची गती चालते देहापुरती तू जाणी -

देहभाव हा टाकुन देई पीठ बिजाचे करि दळुनी
नको मशागत कर्मबिजाची दळुनि नाहिसे करि बिज
पीठ तयाचे होता तुजला अंती मोक्ष मिळे सहज
कर्मबिजा नच अंकूर येई दळूनी सोडीता आसक्ती
मोक्ष हेच फल सत्कर्माचे दुःख नाशुनि सुख प्राप्ती
सजीव बीजा रगडूनि दिधले दान तयांच्या मृत्यूचे
त्या दानाने मृत्यूयोग ते टळले तेव्हा मनुजाचे
सबूरी श्रद्धा ही जात्याची बीजा दळण्या दोन तळी
स्थिरतळ सबुरी निष्ठा वरची दृढ धरूनी बिजास दळी
असे सद्‌गुरू खुंटा नेई सन्मार्गाने निष्ठेला
जाते फिरते त्या पंथाने सद्‌गुरूने जो दावियला.

—प्रा. डॉ. मा. चि. दीक्षित
१२०६–३२ अ. शिरोळे रोड
शिवाजी नगर पुणे. ४११ ००४.

# साईच्या आशीर्वादाची उब

साई,
येऊ दे संकटे
त्यांच्याशी लढण्याचे धैर्य
तुझ्या कृपेन
तुझ्या कृपेनं.
आमच्यात जरूर आहे
पण
तुझ्या आशीर्वादाची उब
असली तरच
संकटं कस्पटासमान आहेत.

—श्री. उज्ज्वल वामनराव कुळकर्णी
बी. एस. सी. बी. एड.
८९६,१. तांबोळी गली, नंदुरबार जि. धुळे.

## साईमय होता हे कृतार्थ जीवन

। साईमय होता हे कृतार्थ जीवन ।
। ओवाळीं मीं प्राण जणू निरांजन ।
। पुष्प नाहीं, फल नाहीं वाहीं मी देवा ।
। मनीं वाटे हा निरर्थक देखावा ।
। बाह्यकारी सोंगे तुज नावडे साई ।
। म्हणोनीं चिंतीतो एकची साईसाई ।
। अहंकार सोडोनी जो स्मरें तुला ।
। त्यासी तू उद्धारीं हे ठावे मला ।
। काया वाचा मनें आचिरितों एक ।
। साईचरणीं माझा हाची अभिषेक ।
। निष्काम निरंतर नांव घेता साई ।
। निश्चित पावसी कांही शंका नाहीं ।

—डॉ. श्री. ग. स. कामत. ११९४/१३
प्रसाद बंगला, शिवाजी नगर पुणें ४११ ००५.

---

## आज आहे कवी संमेलन

आज लिहु तर काय लिहु ।
आज न लिहु तर काय लिहु ।।
आज आहे कवी संमेलन ।
साई वत्सांचे मधूर मिलन ।।
बंधु भगिनी जमतील सगळे ।
श्रवण करण्या प्रेम आगळे ।।
सदैव आठवण बंधुत्वाची ।
होईल भेटी परमात्म्याची ।।
पिता हर्षित होऊनी श्रवतो ।
आपुल्या बाळांचे कौतुक बघतो ।।
सर्वा भूती आनंद बघता ।
स्वर्गची आला भुवरी आता ।।
सर्व विश्वाचा एकच दाता ।
इंदु म्हणे आमुचा साईपिता ।।

—डॉ. इंदुताई नाईक सीताकुंज, लोणावळा.

# गोदावरीच्या काठावरती

(स्वर गंगेच्या काठावरती– या चालीवर)

गोदावरीच्या कांठावरती शिर्डी क्षेत्र महान ।
साईबाबा करती तेथे आपुले वसतीस्थान ॥१॥
भक्तजनांची मांदिआळी धांवती घ्याया दर्शन ।
संत महंत, प्रकांड पंडीत घेती चरणाचे चुंबन ॥२॥
जातपात धर्माधर्म नसे मुळी ती जाण ।
गांजली भागली दुःखी कष्टी देती सर्वांना आलिंगन ॥

---

# साईगजानन एकच असते

गण गण गणांत बोते ।
साईगजानन एका हाते ।
उघडती कैवल्य खाते ।
जे जनकल्याणा तारक होते ॥१॥
साईगजानन परस्परांते ।
अर्पिती निज शिष्यगणाते ।
दृढ कराया अद्वैताचे नाते ।
जे जनकल्याणा तारक होते ॥२॥
साई गजानन जन्मली कोठे ॥
अयोनिज की उद्भिज प्रकटे ।
ठाऊक न कोणा या क्षणांते ।
जे जनकल्याणा तारक होते ॥३॥
(शेगांवी) गजाननाच्या निरवाणीं ते ।
(शिरडी) साई लोळती भूमिवरते ।
साई गजानन एकच असते ॥
सिद्ध कराया कारण पुरते ॥४॥

–डॉ. रा. सी. कापडी (माजी अध्यक्ष)
राजारामपुरी १३वी गल्ली कोल्हापूर.

# श्री साईच्या मंदिरी जाऊन (राग-भैरवी)

श्री साईच्या मंदिरी जाऊन
घ्या भाविक हो ! सद्गुरू –दर्शन ।।धृ.।।
समाधिस्थ श्री जरी जाहले ।
दिव्य ज्योति ना कधी मावळे ।
अगणित भक्ता दर्शन दिधले ।
अनन्य भावे करता चिंतन ।।१।।
शिरडीचे ते विशाल मंदिर ।
बघुनी साईमूर्ती सुंदर ।
समाधीसही नमुनी सादर ।
करा आपुले मंगल जीवन ।।२।।
पुराण सारे देती ग्वाही ।
संतकृपा नच निष्फळ जाई ।
सुदृढ श्रद्धा सद्गुरू पायी ।
पतितांनाही करील पावन ।।३।।
तरण्याला भव सागर भीषण ।
सद्गुरू नौका केवळ साधन ।
संत कृपेचे कवचहि घालुन ।
करि काळावर जय संपादन ।।४।।
जगदुद्धारा जणु अवतरला ।
साई–चरणी जो नर रमला ।
निर्मूळ करूनी भव व्याधीला ।
मुमुक्षूस दे मोक्ष चिरंतन ।।५।।
निष्ठा ठेवुन साई चरणी ।
सद्गुरू सेवा करा अनुदिनी ।
सार्थक जीवन होईल भुवनी
कर्मा करता साई–अर्पण ।।६।।

–डॉ. विनायक गो. दुर्गे 'दुर्गेश'
'सौजन्य', धर्मपेठ विस्तार, नागपूर १०

# परीमल

मज वाटे व्हावे तव माथीच्या रूमालाचे सूत
मग पळून जाईल षड्रिपूचे भूत
वाटे मज व्हावे तव भाळीचा टिळा
मग फुलेल तो भक्तीचा रसाचा मळा
होऊनी अंगीची ती कफनी
तव स्पर्शेजाईल उद्धरूनी
कीं होऊ हातीचा तो कटोरा
भिक्षान्न पडता लाभेल शांती सुखाचा तो झरा
होऊनी खडावा वाटे लावावी चरण कमलाची धूळ
जाईल जन्मोजन्मीचा धुवूनी मळ
की होऊ तव दारीची पायरी
भक्त जनांची सांडेल पायधूळ ममशिरी.
होऊनी चवरी घालूका तुज वारा
साईनाथा सुमनला दे तव पदीच निवारा
घडेल का असे तव चरणीचे होईन तुळशीदल
मग सुटलेरे साईनाथा तुझीया कृपेचा परिमल.

—डॉ. सौ. सुमती खानविलकर
सीता कुंज, लोनावळा.

# पाव श्रीसाई नाथा

पाहू नको अंत आता शिरडीच्या नाथा ।
वळण लागू दे चंचल मना भक्तीच्या पंथा ।
श्रीरंगा तव नाम गंगा निवारी संसार व्यथा ।
सावता माळी पाही जळीतळी रूप तुझे नाथा ।
ईडा पिंगला सुसुम्ने फिरे आत्मा खूण ती माथा ।
नासाग्री लक्ष्य ठेवू पाहू चरण श्रीसाईनाथा ।
थारा दे तव चरणी ठेवी वरदहस्त मम माथा ॥

—श्री. विलास तुकाराम पडवळ
१७३। ४ शिवनेरी, फाळके मार्ग, दादर

# पुनरपि यावरी कधी योग दर्शना ?

(शिरडीत श्रीसाईमाऊलीचा निरोप घेताना साईकन्येच्या मनात येणारे विचार)

पुनरपि यावरी कधी योग दर्शना ?
गे ! आणव माऊली पदी लवकरी पुन्हा ध्रु. ॥

समजली तुला का माझी मनोवेदना ?
आणविसी म्हणूनि का निमित्त करूनी कुणा ?
मी अज्ञ लेकरू नेणे काही एक
जाणते मायचि निज बाळाची भूक –१

हा प्रपंच म्हणजे जळवेलीचा पाश
पोहता आनंदे विळखा ये पायास
तो काढी प्रेमे हलक्या हाते कोण ?
गे ! माय, तूच ना या स्थानी आणवून ? –२.

हे नव्हे तीर्थ गे ! हे तर अमृतपान
हे भोजन कसले, पंचामृत भिक्षान्न
ही नव्हे सावुली, छत्र मजवरी सार्थ
हा निंबतरू ना, माय तूच गे ! मूर्त – ३.

या देही आता तुझेच भरले नाम
ते ओसंडे बघ शब्दाशब्दातून
मी इथे जन्मले तुझिया उदरी पुन्हा
जाहले बाळ मी तान्हे, तुझिया स्थाना –४.

–प्रा. र. श्री. पुजारी
रमानिवास, ९९२ सदाशिव, पुणे–३०.

# पीडित पुकार

जय जय साईनाथ भगवान
पाण्यानी दीप जलवणी वाले ।

दुःखीतांचे दुःख दूर करणारे
भक्त हृदयांत वास करणारे
अभय प्रदायक हे शिर्डिश्वर
आहा तुम्ही कलियुगाचे परमेश्वर
तुझी लीला अपरंपार
भव भय व्याधी मिटाने वाले ।
जय जय साईनाथ भगवान. ॥१॥

जो तुमच्या शरणी येतो
मनांतील इच्छा पावतो
तुम्ही विश्वास भक्ति श्रद्धेने
बनता सर्वांचे आपले जसे
तुम्ही आहा भक्तांचे सखे भगवान
बिघडलेले भाग्य बनवणी वाले ।
जय जय साईनाथ भगवान . ॥२॥

घट घट व्यापी रूप तुमचे
तुमच्याने भरले चराचर सारे
भूत भविष्य वर्तमानाचे
ज्ञानी तुम्ही जन-जीवनाचे
जय हो महा विष्णु भगवान
उलटा चक्र चलवणी वाले ।
जय जय साईनाथ भगवान ॥३॥

भवसागरातून तारनहारे आहा तुम्ही
पतीतांचे उद्धारक आहा तुम्ही

शरणागतांचे पालक आहा तुम्ही
दुष्टाचे संहारक आहा तुम्ही
ऐका माझी पिडित पुकार
नाव पार करने वाले ।
जय जय साईनाथ भगवान
पाण्यानें दीप जलवणी वाले ॥
(प्रो. ए. पी. त्रिपाठी की हिन्दी कविता का रूपान्तर :)

—प्रो. एच. बी. महाले. अध्यक्ष, गणित विभाग
ज. ह. शासकीय महाविद्यालय, बैतूल

---

# उठी साईनाथा

कलिका फुलांचा मधुगंध आला
उठी साईनाथा, उठी बा कृपाळा ॥धृ.॥
बघ भाविकांचा जमला जथा हा
सुमना वरी त्या जणू भृंग यावा
तव दर्शनाला थांबून मेळा
उठी साईनाथा उठी बा कृपाळा ॥१॥
सजली प्रमोदे तव द्वारका ही
मधु बासरीचा बघ सूर येई
आनंद असा तव आरतीला
उठी साईनाथा उठी बा कृपाळा ॥२॥
उजळे उषा ही पूर्वेस देवा
तुझिया कृपेचा आशिष द्यावा
गीतांजलीने तम नाश झाला
उठी साईनाथा उठी बा कृपाळा ॥३॥

—श्री. शांताराम नांदगावकर
"प्रशांत १९ ब, २० वा रस्ता, खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२.

# वंदना

साईनाथा पहिले वंदन ।
दुसरे वंदन अध्यक्षा ॥
जेष्ठ, श्रेष्ठ हे लेखक कवीजन ।
वंदन माझे सर्वांना ॥१॥

संमेलनास्तव उत्सुक आम्ही ।
भक्त दर्शने येते स्फूर्ती ॥
देवदर्शने मनी प्रसन्नता ।
वंदन पहिले साईनाथा ॥२॥

साईकुटुंबियांची साई भक्ती ।
वाण न कांही मिळते प्रिती ॥
लेखक कवींचे होते मीलन ।
साईनाथा पहिले वंदन ॥३॥

चंद्रसूर्य हे जोवर असतील ।
अमर राहील साईलीला ॥
अमर राहील हे संमेलन ।
अमर असतील लेखक कवीजन ॥४॥
साईनाथा पहिले वंदन

—डॉ. सौ. मालतीबाई राहाटे
मेडीकल ऑफीसर सामान्य रूग्णालय
मु. पो. जि. भंडारा.

# माझी काळजी साई तुला

माझी काळजी साई तुला ।
तू जर माझ्या सांगाती मग, कसली चिंता मला ।।धृ.।।
तुलाच मानियेला मी माझा । निश्चित मम हृदयाचा राजा ।।
एकनिष्ठ मी तुझा सेवक, मालक तूच मला ।।१।।
मला हवे ते जरि न मिळाले । कारण तव संकेत निराळे ।।
योग्य क्षणी परि योग्यच होईल, असे शाश्वती मला ।।२।।
राहीन कधी का मी लाचार । कारण तव कर असती हजार ।।
आणशील जर साई ! तू क्षणभर थकेल कर इवला ।।३।।
तुझ्याकडे मम लाज गहाण । कुणापुढे नच झुको ही मान ।।
स्वाभिमानी हे जीवन जगण्या, शक्ती दे नागेशाला ।।४।।

—श्री. नागेश मोगलाईकर,
नागलक्ष्मी, २८२०, ग. नं. ४. धुळे ४२४००१

# साईमाऊली गोंधळाला आली !

आली आली हो गोंधळाला, गोंधळाला आली
साईमाऊली माझी आई, साईमाऊली आली
आई उध ग साई आई, साईमाऊली माझी आई
खुशीनं गोंधळाला आली र साईमाऊली माझी ।।१।।
संबळ घेऊन आईचा गोंधळ घालतो
दिवटा पेटवून भक्त आईचा नाचतो
वेळेला धाऊनी आली र साईमाऊली माझी ।।२।।
हात जोडूनी तेलाचा दिवा मी आता लावला
झुणका भाकर निवेद्य आईला पावला
फुलांचा माळा घालू र साई माऊली आली ।।३।।
संबळ तालावर रातभर गोंधळ रंगला
भक्त आईचा शुद्धबुद्ध पार विसरला
भक्ताच्या नवसाला पावली र साई माऊली माझी ।।४।।

—लावणी सम्राज्ञी सौ. आसावरी वायकूळ
संगीत विशारद, इ–९।८ बर्वेनगर,
घाटकोपर (पश्चिम). मुंबई ४०० ०८४.

# श्रीसाई भूपाळी

सकाळ झाली रवी उदेला । रक्तरंग ये प्राचीला
सान–थोर भक्तांचा मेळा । दर्शनास दारी जमला ।।

कुणि पंजाबी, कुणि बंगाली । कुणि कन्नड, तेलगू
हिंदी, मराठी, तामिळ, गुर्जर । राजस्थानी बंधू ।।
धर्म–पंथ भेदा विसरुनी । प्रेम–भाव जोडूनी
भारती घर–कुल बनुनी साई । येईल तुमचे मन भरुनी ।।

पाच तपाची निद्रा सोडुनि । द्या दर्शन भक्ता
बाहती आक्रोशे प्रेमाने । तुज साईनाथा ।।
उठा उठा द्या स्वकरे भक्तां । उदी न संजिवनी
भस्म नव्हे ही अमृत गुटिका । अमोल या भुवनी ।।

कुणी मागती कन्या–पुत्रा । कुणि धन दौलतिला
देई मला साईनाथा । अविरत भक्तीला ।।
भक्तीपोटी मिळेल सारे । तुम्हीच देणारे
गूढ मनिचे अचूक आपण । त्वरित उकलणारे ।।

शरण तव पदी आलो वाचून । ऐकून तुमच्या लीला
दूर नका ठेवू श्री साईबाबा । ह्या निज भक्ताला ।
शिरडीचे पावन सिंहासन । भारतिया भूषण
उठा भेट द्या साईदेवा । त्रिवार लोटांगण ।।घेई बा त्रि. ।।

—श्री. बाळकृष्ण अ. देसाई.
१५१, गोखलेरोड, भांगरवाडी,
लोनावळा ४१० ४०१.

# आई

(माझ्यावर मातेसमान प्रेम करणाऱ्या ताराई चेंदवणकर यांचे निधनानंतर सुचलेले विचार.)

तुझे रूप आई फुलासारखे ग, ।
तुझे गुण आई झऱ्या सारखे ग, ।
तुझी किर्ती आई सदा सुगंधीत राही, ।
तुझे कर्तृत्व मज सदा स्फुर्ती देई, ।
तुझे बोल मज सदा शक्ति देई,. ।।

नाम तुझे सदा तारा मज तारी, ।
तुझ्या रूपे आई दिसे मज साई, ।
निरोप न मज तुझीया अंतरीचा देई. ।
खंत तुज असे दादा अन, बाबाची ।

रक्षील साई सदा निर्धास्त तू राही ।।
सदा– सर्वदा सांगत होती तू साईना ।
बाबा सौभाग्याचे दान मज द्या ना, ।
सुमुहूर्ती हाक तुझी ऐकली बाबांनी, ।
अन् गेलीस बाबांठाई तू आम्हा सोडूनी ।
आक्रंदितो आम्ही आईऽआई रात्रंदिनी ।।

आवड तुज अति साईभक्तांची ।
साथ तुज लाभली साईलीलेची ।
लाभले बहू साईभक्त–बंधू–भगीनी ।
शिर्डी क्षेत्री भेटू लागले संमेलनी ।
तुज विण मन लागेना ह्या स्नेह–संमेलनी ।।

—सौ. शशिकला रेवणकर कुंटोली अंबरनाथ.

# समाधी मंदिर

देवा साईनाथा
आलो तुझ्या दारी
समाधी मंदिरी ... दर्शनाला ॥१॥

शांत होई जीव
तृप्त होती डोळे ...
भाव माझे भोळे ... अर्पितो मी ॥२॥

तुझ्या दर्शनाने
नेत्र ओलावती ...
अश्रु सरी येती ... आनंदाच्या ॥३॥

समाधी मंदिरी
बघुनिया रूप ...
आधी व्याधी ताप ... नष्ट होती ॥४॥

समाधी मंदिरी
बसे क्षणभरी ...
दुःख क्लेश हारी ... साईनाथ ॥५॥

देवा साईनाथा
तूच माझा त्राता ...
भक्तावर आता ... कृपाकरी ॥६॥

शिरडीचा देव
माझा साईनाथ ...
अनाथांचा नाथ ... आहे खरा ॥७॥

—श्री. रमेश डी. चव्हाण.
साईनिकेतन, गुजरलेन कॉर्नर
मु. पो. ता. नवापूर जि. धुळे.

# साई शायरी

★★★★★★卐★★★

शिरडीके नाम को हम जानते हैं दास,
साई का नाम विश्वमें, धूम मचा रहा हैं !!

जान को प्रेम चाहिए, प्रेम को जान चाहिए ।
हमें साई चाहिए, और साईको हम चाहिए ।
आकार, निराकार, के झंझट में हम नहीं हैं ।
खुदा को भूले हैं, सिर्फ साई हमें चाहिए !!

पत्थर पर बैठकर हुकुमत जो कर रहा है,
अकबर, शहाजहाँ, का दरबार भी शरमा रहा है !
इन्द्र आकर जो पेदेखा, साई के दरबार को यारों ।
अप्सरा, और मेनका भी यही आ गये हैं !!

साईका एक खतरा भी प्यास को बुझाता है ।
फिजूल ऐसा समन्दर जो जहर बना हुआ है !!

शिरडी का नूर, हर तरफ रोशन जहाँ में,
साई जिन्दा रहेगा, साई का नूर जिन्दा है !!
भक्तों की पुकार सुन तुम विविधरूप अपनाते हो !
खुब–साई ताजोदिन दरगों की आग बुझाते हो !!

एक बात तुम याद रखना, भरोसा सिर्फ साईका है !
जो साईपर मिट जाते हैं, उन पर साई मिट जाते हैं !

–प्रा. गुंडेराव पटवारी
एन. एफ. जे कॉलेज,
पो. बिदर (कर्नाटक)

# ऐसे भेटले मज साईनाथ

लागली जीवास हुरहूर
बाबा तुमच्या दर्शनाची
पाहूनि तुमची दिव्य सुन्दर मूर्ती
गेली नाही अशांतता मनाची.
मूर्ती ती मूर्ती केवळ
नाही यात हालचाल
ऐसे माजले हृदयात काहूर
लागली जीवास हुरहूर
परि हास्य वदन ती मूर्ती
पहाता कौतुक दाटले चित्ती
काय ही कलावंताची कला
मनी हा भाव उमटला
निरखित असता मूर्ती सुन्दर
लागली जीवास हुरहूर –२
जणू माझ्या अंतरीचा भाव
जाणूनी तुम्ही साईदेव
दाविला चमत्कार एक
आली महिला एक धावत
तुम्हा पाहूनी ती प्रसन्न होत
आणि केला वाकुन नमस्कार
लागली जीवास हुरहूर –३
ती वदती झाली मज
'बहनजी, मूर्ती हंस रही है ना आज ?
हां हंस रही है

लेकीन क्यों पूछ रही हो ?

ऐसे मी पुसता तीज

गत वर्षी मूर्ती भासता रडकी

संकट अपार कोसळे मजवर

लागली जीवास हुर हुर —४

ऐसे तिचे उत्तर ऐकून

शंका मनीची गेली फिटून

इथेच पटले मनोमन

बाबा नाहीत दूर मज पासून

ते अनंत कोटी साक्षात् मज समोर

लागली जीवास हुरहूर —५

मी मूर्ख नादान अज्ञान

'भाव तेथे देव' याचे नव्हते ज्ञान

परि कृपाळू साईनाथ

मजवर होऊनी कृपावंत

देऊनी दर्शन मज केले धन्य

ऐसे भेटले मज साई रमावर

लागली जीवास हुर हूर—६

—सौ. मथूरा बाई हिबारे एम. ए.
सिंगार बाग बीदर घ. नं. १–८–२५.
पो. जि. बीदर (कर्नाटक) ५८५४०१

# शिरडी दर्शन

शिर्डीच्या मंदिरात कोण ग आई
जगाचा राखणकर्ता साई.
तर मग निघूया...
बाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन येऊ या (१)

बाबांच्या मंदिराजवळ हे काय आई,
पाण्याचे दिवे पेटले ती द्वारका माई,
तर मग घेऊ या ...
द्वारकामाईतले साईदर्शन घेऊन येऊ या (२)

बाबांच्या शिर्डीत हे काय आई,
खंडोबाचे देऊळ जेथे प्रकटले साई,
तर मग बसू या...
बाबांचा प्रेम रस घोटभर पिऊन घेऊ या (३)

बाबांच्या शिर्डीत अजून काय काय आई,
बाबांचे गुरूस्थान, चावडी बघितली की नाही,
चल निघू या...
बाबांच्या गुरूचे समाधीस्थान पटकन बघुन येऊ या (४)

शांतीनिवास मध्ये हा कसला आहे सोहळा,
"श्रीसाईलीले"च्या लेखक कवींचा येथे भरलाय मेळा,
क्षणभर बसू या...
बाबांच्या हयातीतल्या व्यक्तीचे प्रत्यक्ष दर्शन घेऊ या (५)

कधी हरवलो आपण दुःखाच्या रानात,
श्रद्धेने आणावे साईला
नेईल रे...
दुःखाच्या रानांतून सुखाच्या बागेत तो नेईल रे (६)

—श्री. प्रकाश प्र. कर्पे
२४, रामबाग इन्दौर (म. प्र.) ४५२००४.

# मूढ राहूनी जीवन अर्पिले

***********************

(श्री साईचरणी विलीन होण्याच्या पूर्वी काही दिवसच अगोदर ही कविता श्री साईकाव्य बहार अंकासाठी कवीयित्रीने तयार करून ती दिली होती. त्यांची अंतीम इच्छा म्हणून आदर पूर्वक ही कविता प्रकाशित करीत आहोत का. सं.)

मूढ राहूनी जीवन वेचिले
आप्त स्वकियांचे पाश बांधिले
द्रव्यार्जनीही मोहूनी गेले
माझे म्हणूनी धुंद राहिले ॥

नाही केले साधक चिंतन
संसारातही पोळूनी गेले
कामा पुरते राम म्हटले
समाधी कडे जागृत झाले ॥

आर्त स्वराने आळविते तुजला
नको दूर करू तू साई मजला
शरणांगताची तूची माऊली
जन्मदात्रीही नाही राहिली ॥

नको रे पाहू अंत आता
त्रैलोक्याचा तूची सूत्रदाता
फसवू नको तू मज अनंता
अल्ला मालिक फकीर म्हणता ॥

येऊ दे तो कोण कसाही
म्हणेन मी काळ त्यासी
अखंड सौभाग्य मागीन नमूनी
हासत नेई रे साई चरणाशी

"भगवान श्रीसाईनाथार्पणमस्तु"

अ. सौ. कै. तारा चेंदवणकर,

# भक्तांचे मनोगत

(पावन श्री क्षेत्र शिर्डी–निवासी साईनाथांच्या स्मृति सुगंधातून उस्फूर्त पणे प्रकट झालेले काव्य :)

भाव भक्तिने जगण्या जीवन
तुझी साईशा साथ हवी ।
भवसागर हा तरावयाला
नाव कृपेची त्यात हवी ॥१॥

रूप सावळे तुझे पाहण्या
दिव्य प्रेममय दृष्टि हवी ।
गुण गान मुखी तुझेच गाण्या
रसिकतेची तुष्टि हवी ॥२॥

विवेक आणि वैराग्याची
तुझ्या दिशेने चाल हवी ।
सुख शांतीचे लेण्या भूषण
तुझ्या दयेची ठेव हवी ॥३॥

समर्पणाची बुद्धी हवी अन्
तव चरणांची आस हवी ।
तुझ्या अंतरी ठाव मिळो ही
एकच मनिषा खास हवी ॥४॥

–श्री. श्याम जुवळे जनार्दन भुवन,
९ छबिलदास रोड, दादर

# साईभेट

कधी त्यागीन द्वारखंठा
साई पाहीन ही उत्कंठा

साईचेच विचार मनात
बाबा सर्व काही जाणत

परी आज्ञा घेतल्या विना
पाऊल बाहेर पडेना

म्हणून घेई बाबांचा कौल
म्हणाले पोरी लवकर चल

माझ्या गालांत आले हसू
नेत्री प्रेम भरले आसू

मी शिरडीत गेले थेट
तेथे घडली मज भेट

पडताच पाऊल विठी
मी चरणी घातली मिठी

भाग्य कसे उदेले
जीवन साई मय झाले ॥

—सौ. उषा प्र. अधिकारी
सावित्री सदन बंदर रोड, रत्नागिरी

# अगा-अगा साईनाथ

अगा-अगा साईनाथा, कंठी आले प्राण
दर्शन ते द्यावे आता, द्यावे हेची दान ॥धृ॥

कुठे सोडूनिया गेली, धेनू वासराची
पाखरू सदैव पाहे, वाट पक्षिणीची
शोधे मुके पाडस आपुली, हरीण रानोरान ॥१॥

कुठे गुंतलासी सांगा घ्यावया उपाधी
चरा-चरी कोठे तुमची, लागली समाधी
कुठे सांगा तुम्ही नाथा, लाविलेत ध्यान ॥२॥

रात्रं-दिन ध्यासा पाई, विसरलो स्वतःला
आस दर्शनाची देवा, लागली जीवाला
आपुले पणाचे आता, राहिले ना भान ॥३॥

-श्री. ग. रा. पालकर.
२२३ / २ दारुवाला चाळ,
बझार वॉर्ड, कुर्ला मुं. ४०० ०७०

# तुझ्या चरण कमली देरे निरंतर मजला स्थान

अंगावर भर जरी शेला मुगुटावर तुरा छान
रत्न जडित सिंहासनी दिसे सुंदर साईचे ध्यान
असे दर्शन दे मजला साई नको करू अपमान
तुझ्या चरण कमली दे रे निरंतर मजला स्थान

तूच ब्रम्हा विष्णु महेश तूच आमचे श्रद्धास्थान
नकोच मला धन दौलत किर्ती नको वरदान
संकटाच्या वाटेवर तूच आम्हा एक आश्रयस्थान
तुझ्या चरण कमली दे रे निरंतर मजला स्थान

साईनाथा आम्हां भक्तावर सदा करा कृपाप्रदान
साई साई गाता गाता हरपले माझे देहभान
लीनदिन असे तुझा भक्त सोडून सारा अभिमान
तुझ्या चरण कमली दे रे निरंतर मजला स्थान

श्री. रमाकान्त पंडित
प्रभास्मृती, भाऊदाजी रोड, माटुंगा मुं. १९

# पुण्य स्मरण

गुरूराज विनविते तुम्हा ।
द्या आशिष आज आम्हा ।।धृ।।

पद कमले ही सुरम्य साची ।
मूर्ती साजीरी मम साईची ।
भासे उजळली अवघी प्राची ।
तव स्पर्शाची कधी होईल लाभ आम्हा ।।१।।

युगे युगे मी वाट पाहिली ।
कथा किर्तने तुझी गाईली ।
ध्यानी मनी ही भरून मुरली ।
तव पद कमली कधी लाभेल शांती आम्हा ।।२।।

भक्तांची अमर्त आळवणी ।
ज्ञात तुला ही होई तत्क्षणी ।
वायु सम तू येशी धावूनी ।
परी अहपणाचा कधी लागो न वास आम्हा ।।३।।

पुण्य स्मरण हे तुझे आजला ।
वासल्याचे वर्ण तव स्मृतीला ।
वंदन माझे सदैव तुजला ।
तव कृपेचा सदैव ध्यास अम्हा ।।४।।

पंच पंच ह्या उषःकाली ।
भक्त मंडळी अवघी जमली ।
तव जय कारे शिर्डी दुमदुमली ।
लाभे तव सान्निध्य आज आम्हा ।।५।।

–सौ. अस्मिता कमळाकर दांडेकर
६९ बी खाडिलकर रोड, गिरगाव मुं. नं. ४००००४.

# ॥ साईनाथा साईनाथ ॥

साईनाथा, साईनाथ
नित्य धरा हात
तुम्ही आमुचे तात
अेकले या जगतात ॥१॥

साईनाथा, साईनाथ
तुम्हीच माय बन्धु
तुम्हा विण ना कोणी
साऱ्या या विश्वात ॥२॥

साईनाथा, साईनाथ
ठेवा वरद- हस्त
दया कृपामृत
लाभो आम्हा रात दिन ॥३॥

साईनाथा, साईनाथ
द्या आम्हा प्रकाश
अज्ञानाचा करा नाश
प्रकटवा धर्म तेज ॥४॥

साईनाथा, साईनाथ
मानवता करा दृढ
भेद भाव करा नष्ट
मानवाच्या जगतात ॥५॥

साईनाथा, साईनाथ
तुम्हीच विश्व मालिक
सांधा मने सबुरीने
दूर करा दैन्य दुःख ॥६॥

—श्री. प्रभाकर कोळमकर
बोरीवली (पूर्व) मुं. ६६

# साईना जयकारा

वाजनी टिपरी । वाजा नगारा
शिरडी गावमा । कसाना पुकारा ॥

वाजनी तुतारी । वाजनी ती भेर
सेवक करेत । जय जयकार ॥

वाजनी बासरी । वाजना पवा
शिरडी दरबारे । साईजोनी सेवा ॥

वाजता तो ढोल । वाजनी परवाल
साई मंदिरमा । फेका हो गुलाल ॥

वाजना तंबोरा । वाजे भाय इना
हात म्हान टाय । बोल साईजीना ॥

वाजे घंटानाद । साईना गाभारे
वनी हो सवारी । साई दरबारे

वाजतीस टाया । भक्त नाचतस
साईना शिर्डीले । जतरा भरस ॥

लीला म्हने आठे । नही कमतरता
भरे मन्ही झोयी । साई नाम लेता ॥

---

टिप:— वाजनी— वाजली. गावमा— गावात. कसाना— कशाचा पवा— पावा बासरी— वांसरी. हातम्हन टाय—हातामधे टाळ इना— विना. संख नाद शंखनाद. वनी— आली. टाया— टाळ्या . जतरा— यात्रा. आठे— इथे मन्ही— माझी. झोयी— झोळी

कवयीत्री :— सौ. लीला डी. मराठे.
काठी बंगला साक्री रोड, धुळे.

# माऊली भोजन

(सर्वशक्ती नवदुर्गा साईमातेला, दसऱ्याच्या सणा दिवशी एक लेक प्रेमाने जेऊ घालीत आहे.)

साई माऊली ग माझी, येई आई जेवायला ।
विनविते लेक तुझी सण दसऱ्याचा आला । ।।धृ।।

चंदनाचा पाट तुला, देते बैसायला आता ।
चांदीचा ताट तांब्या, ठेविला ग हा पुढता ।
रंगी बेरंगी रांगोळी, काढिली ही नक्षीदार ।
सुटला मंद सुगंध, वास उदाचा हा फार ।
साई माऊली ग माझी ।।१।।

आंबे मोहराचा भात, त्यावरी वरान्न सुंदर ।
नाजुक मऊ पुरण पोळी, लोणकढे तुपाची धार ।
भरली भाजी वांग्याचीही, भरीत दही कोशींबीर ।
भजी वडे पापड, लोणचे आमटी सार ।
थाट शोभे पक्वान्नांचा, भाव भक्तीचा हा घास ।
माय माझी शांत होई, देई तृप्तीची ढेकर ।
साई माऊली ग माझी ।।२।।

पांच पानांचा हा विडा, चुना, काल, सुपारी ।
लवंग जायफळ वेलची, कुटिला विडा मुख शुद्धि ।
विडा रंगला प्रेमाचा, हासे माय पोर वेडी ।
साई माऊली ग माझी, येई आई जेवायला ।
विनविते लेक तुझी, सण दसऱ्याचा आला । ।।३।।

—सौ. शांता अंबाजी सरोदे
उल्लेंगल बि. नं. ६. खो. नं. १०.
एन. सी. केळकर रोड, दादर मुंबई २८.

# बोला हो जरा तुम्ही बोला

(चाल :– ढगाला लागली कळ)

बोला हो जरा तुम्ही बोला,
श्री साईनाथ बोला ॥धृ॥
विघ्नहर्ता, मंगलकर्ता,
काय हा महिमा तुझा ॥ बोला ॥
या हो बंधुंनो, भक्त जनांनो,
नित्य करू भजन ।
संगीताच्या नादात, भक्तीच्या जोशात,
गाऊ या साईचे नाम ॥
साईला चंदन लावा.
श्री साईनाथ बोला ॥१॥ बोला ....
संन्यासाचे व्रत घेऊनी,
गरीबांची केली सेवा ।
अल्ला ही मालीक नेहमी म्हणती,
नाही तुला अभिमान ॥
साईचा अभिषेक करा,
श्री साईनाथ बोला ॥२॥ बोला ...
मशिदीमध्ये धुनी जाळूनी,
बसलाय असा हो कसा ।
चिमूट – चिमूट उदी देऊनी,
रोग्यांची केली सेवा ॥
साईला वंदन करा,
श्री साईनाथ बोला ॥३॥ बोला ...
दर गुरूवारी पालखी निघते,
लोकांची भरतीय जत्रा ।
लेझीम कुदतीं आणि लोक नाचती,
काय हा सोहळा मोठा ॥
साईच्या पालखीला हात तुम्ही लावा,

श्री साईनाथ बोला ॥४॥ बोला...
या हो बंधूनो, भक्त जनांनो,
समाधीवर मस्तक ठेवा ।
देईल फळ तो, सत्याचे फळ तो,
नित्य तुम्ही हो जाणा ॥
पण श्रद्धा–सबुरी ठेवा,
श्री साईनाथ बोला ॥५॥ बोला...
शिरडीला आला आणि वाया गेला,
दाखवा ऐसा कोणी ।
जो तुज भजे जैसा भावे,
तैसा पावे तू हो त्यासी ॥
पण अंतर निर्मळ ठेवा,
श्री साईनाथ बोला ॥६॥ बोला...

–श्री हसमुख ओंकार पाटील
गुजरगल्ली, मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे, पिन–४२५४१८.

---

## साईपद

साईसाई ह्याचो जप करा ।
तेथे मनाला समाधान ॥
साई ह्याची वैद्य सकळ जगाचा ।
साई ह्रेची विश्वरूप धरा भावना ॥
साईनाम जपूनी करा करा उपासना ।
जिकुंनी वासना मुक्त होशी ॥
सतत जपूनी साई साई मंत्र ।
दासाला उद्धरी साई राम ॥

–श्री रघुनाथ बाबूराव सांडभोर
साईसदन, ५७०, दत्तवाडी पुणे, नं. ३०.

# धन्य धन्य ती बायजाबाई

(पू. बायजाबाई कोते)

(शिर्डी क्षेत्रात श्री साईसमकालीन बाबांची निस्वार्थ, अंतरीच्या प्रेमाने सेवा करणाऱ्या ज्या काही व्यक्ती होत्या त्यामध्ये बायजाबाई कोते यांची सेवा, श्री बाबांच्या वरील प्रेम, त्यांच्या वर असणारी श्रद्धा – भक्ती याचे मोल करताच येणार नाही. या स्वार्थी युगात असे भक्ति करणारे पाहावयास मिळणार नाहीत.)

धन्य धन्य ती बायजाबाई । जिथे तिने ओळखला साई
डोईवरी पाटी हाती लोटी । जाण्याची होतसे घाई ।
वक्त जाहला दो प्रहराचा । धरती तप्त ती होई ।

थंडी वारा ऊन पाऊस । खाचा खळगे तुडवीत जाई ।
साद देती "साई साई" । भुकेला आत्मा ओळखला जाई ।
निस्वार्थ ते प्रेम होते । वना-वनातन फिरत ही बाई ।

धन्य ती बायजाबाई । जिथे तिने ओळखला साई ।
द्वारकामाईतील हा भिकारी । कुबेरास लाजवी ।
भुकेची जाणीव ती नाही । चिंतनी मग्न तो राही ।

तीन प्रहराला हाती झोळी । भाकर दे पुकारीत राही ।
अमर झाली ती बायजा । बैसली दरबारी साई ।
धन्य ती बायजाबाई । जिथे तिने ओळखला साई ।

—सौ. उषा प्रभाकर मुळे, पेटकर वाडा
१६० नारायण पेठ, पुणे ३०

# श्री. सद्गुरु साईनाथ स्तोत्र

श्री गणेशाय नमः ॥ श्री सद्गुरु साईनाथाय नमः ॥
साईनाथ नमस्तुभ्यं नम स्तुभ्यं दयानिधे ॥
कृपासिन्धो नमस्तुभ्यं आर्तिहन्मे नमोनमः ॥१॥
सच्चिदानंद नमस्तुभ्यं परमहंसाय ते नमः ॥
योगिराज नमस्तुभ्यं वीतरागायते नमः ॥२॥
मृत्युंजय नमस्तेऽस्तु केदाराय नमोनमः ॥
विश्वेश्वर नमस्तुभ्यं रामेश्वर नमोनमः ॥३॥
पांडुरंग नमस्तेऽस्तु दत्तात्रेय नमोनमः ॥
रावणान्तक रामाय गोपिकारमणायतेनमः ॥४॥
विश्वव्यापक नमस्तेऽस्तु विश्वसाक्षिणेनमोनमः ॥
भक्त पालकाय नमस्तुभ्यं भक्तचालकाय नमोनमः ॥५॥
नारायणाय नमस्तुभ्यं जगतः मुखेनमः ॥
अनंत रूपाय नमस्तुभ्यं सर्वान्तर्यामिणे नमः ॥६॥
जीवा धाराय नमस्युभ्यं सर्वाधाराय ते नमः ॥
भक्त भावावताराय परार्थदायिने नमः ॥७॥
चिदानन्दाय नमस्तुभ्यं चिदाकाशाय ते नमः ॥
ज्ञानस्वरूपिणे नमस्तुभ्यं श्रीमसद्गुरवे नमः ॥८॥
यो भक्त श्रद्धया युक्तो नित्यमेतां स्तुतिंजपेत् ॥
भुक्त्वा भोगान्यथाकामं साईपदमवाप्नुयात् ॥॥॥
इति श्री साईदास सद् विरचित श्री साईनाथ

स्तोत्र संपूर्णम् ॥

श्री सद्गुरु साईनाथ चरणार्पणमस्तु ॥

—श्री. स. व्यं. कुलकर्णी एम. ए.
२४६५ ए वार्ड वरुणतिर्थ वेस कोल्हापूर

**TO BE PUBLISHED IN PART II SECTION3(ii) OF THE GAZETTE OF INDIA**

GOVERNMENT OF INDIA, Ministry of Finance, Department of Revenue New Delhi Dated 23.12.1983.

**NOTIFICATION ;– INCOME TAX**

No.5548: (F.No.197/64/83- IT(AI) (.): exercise of the powers conferred by clause (V) of Sub-Section(23C) of Section 10 of the Income tax Act. 1961 (43 of 1961), the Central Govt. hereby notifies "Shri Sai Baba Sansthan Shirdi" for the purpose of the said section for the period covered by the assessment years 1983-1984 to 1985-1986.

( R.K.TEWARI )
UNDER SECY. TO THE GOVT. OF INDIA

To, The Manager,
Government of India Press,
Ring Road, Mayapuri Industrial Area, New Delhi.

Copy to :-

1. Shri K.H.Kakre, Court Receiver, Shri Sai Baba Sansthan Shirdi, Santiniketan, 804-B, Ambedkar Road, Dadar Bombay
2. The Commissioner of Income-tax, Bombay City-IV, Bombay with reference to his letter No. BC.TC/289(44)/82-83 dt.27.9.83.
3. All Commissioners of Income- tax.
4. Directors of Inspection (IT) /(R&S) / (Inv.), New Delhi.
5. Director of O&M Services (Income-tax), Ist floor, Aiwan-e-Ghalib, Mata Sundri Lane, New Delhi (5 Copies).
6. All Officers & Sections of. T. Wing of CBDT, NEW Delhi
7. Comptroller &Auditor Gl. of India, New Delhi (20 Copies).
8. Bulletin Section of Dte. of Ins. (RS&PR), New Delhi (5Copies)
9. Director of Training, IRS(Direct Taxes), Staff College, Nagpur ( 5 Copies ).
10. Shri P.K. Kartha, Joint Secy., Ministry of Law, Justice and Company Affairs (Department of Legal Affairs), New Delhi

( ATMA RAM )
**SECTION OFFICER .**

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी जि. अहमदनगर

दहावे श्रीसाईलीला लेखक कवी संमेलन सन १९८४.

रविवार दिनांक २९ व सोमवार दिनांक ३० जानेवारी १९८४.

अध्यक्ष :– श्री. रा. रा. लक्ष्मणराव सदाशिव नाईक, इंदूर.

स्थळ :– साईउद्यान, नवीन निवासस्थान.

## कार्यक्रम पत्रिका

रविवार दिनांक २९ जानेवारी १९८४.

पहिले सत्र :– वेळ सकाळी ९ ते १२ पर्यंत.

| | |
|---|---|
| १) स्वागतगीत | – रचना – सौ. आशावरी वायकूळ गायक निवेदिता – लावणी सम्राज्ञी सौ. वायकूळ. |
| २) संमेलनाचे उद्‌घाटन | – मा. श्री. क. हि. काकरेसाहेब, न्यायालयधारक, श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी यांचे शुभहस्ते. |
| ३) श्रीबाबांच्या प्रतिमेसमोर समईज्योतीचे प्रज्वलन. | – श्री. अध्यक्षांचे शुभहस्ते. |
| ४) दिवंगत साईभक्त व हुतात्मे यांना श्रद्धांजली. | – |
| ५) संमेलनाचे संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा. | – श्री. सदानंद चेंदवणकर. |
| ६) अध्यक्षांचा परिचय | – डॉ. श्री. दि. परचुरे |
| ७) श्रीसाईलीला काव्यबहार मराठी व इंग्रजी आवृत्तीचा प्रकाशन समारंभ. | – श्री. लक्ष्मणराव नाईक. |
| ८) श्रीसाईलीला काव्यबहार अंक उपस्थित लेखक-कवी यांना अंक व पुरस्कार भेट. | – श्री. लक्ष्मणराव नाईक यांचे शुभहस्ते. |
| ९) उपस्थित लेखक कवी व अन्य श्री साईभक्त मंडळी यांचा अल्पपरिचय. | – |
| १०) दुपारी होणाऱ्या कार्यक्रमाची रूपरेषा | – |
| ११) श्रींची आरती | – दुपारी १२ वाजता. |
| १२) प्रसाद ग्रहण. | – |
| १३) विश्रांती. | – |

**दुसरे सत्र :– दि. २९ जानेवारी, १९८४ दुपारी ३ ते ६.**

| | |
|---|---|
| १) श्रीसाईलीलासाठी कसे लिहाल (माहितीपर निवेदन). | – श्री. सदानंद चेंदवणकर |
| २) श्रीसाईलीला बद्दल मला काय वाटते? | – सर्वांसाठी विचार मंथन. |
| ३) श्री साईलीलाचा आणखीन विकास कसा करता येईल. | – खुली चर्चा सर्वांसाठी. |
| ४) श्रींची आरती | – सायंकाळी ६–१५ ते ६–४५. |
| ५) प्रसाद ग्रहण | – सायंकाळी ७–०० ते ७–४५. |
| ६) श्रींचे दरबारास हजेरी | – रात्रौ ८ ते १०. |
| ७) श्रींची आरती | – रात्रौ १० ते १०–३०. |

**सोमवार दिनांक ३० जानेवारी १९८४ तिसरे सत्र: सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत.**

१) श्रीसाईलीला विकासाच्या दृष्टिने चर्चा व सूचनांचा विचार विनिमय.
२) राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना व हुतात्म्यांना आदरांजली.
३) अध्यक्षांचे परवानगीने पुढे येणारी कामे.
४) माजी अध्यक्षांची भाषणे.
५) श्रींची आरती.
६) प्रसाद ग्रहण
७) विश्रांति.

**चौथे सत्र शेवटचे. दुपारी ३ ते ६.**

१) बालभक्तांचे विविध कार्यक्रम.
२) अध्यक्ष महोदय श्री. लक्ष्मणराव सदाशिव नाईक यांचे भाषण.
३) श्री. क. हि. काकरे न्यायालय धारक यांचे समारोपाचे भाषण.
४) श्री. लक्ष्मणराव सदाशिव नाईक यांचा सत्कार.
५) आभार प्रदर्शन :– डॉ. श्री. दि. परचुरे, कार्यकारी संपादक श्री साईलीला इंग्रजी आवृत्ति.
६) संस्थानतर्फे आभार :– श्री. द. चि. पाठक, शासकीय अधिक्षक, श्री साईबाबा संस्थान. शिर्डी.
७) पुरुष लेखक–कवी यांचे तर्फे आभार प्रदर्शन.
८) श्रीसाईलीला कवयित्री यांचेतर्फे आभार प्रदर्शन.
९) निरोपगीत – श्री. नागेश मोगलाईकर, धुळे.

निवेदन, गायिका – सौ. आसावरी वायकूळ.

टीप :– सोयीप्रमाणे वरील दोन्ही दिवसांचे कार्यक्रमात फेरबदल करण्यात येईल.

**क. हि. काकरे**
न्यायालय धारक,
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी,
व
मुख्य संपादक, श्रीसाईलीला.

# साईगान

साई साई जयघोष चालला
टाळ वीणेच्या तालावरती
शिरडीच्या या नाथ महाली
भक्तजनांना मिळते शांती ॥धृ.॥

दर्शन घेता श्री नाथांचे
अंधारातही प्रकाश दिसतो
प्रसन्न मंगल या भूमीवर
चैतन्याचा ठेवा वसतो
प्रगाढ, पावन नाथकृपेने
ज्योत तेवते पाण्यावरती ॥१॥

बाबांच्या त्या पदस्पर्शाने
पावन झालेली ही नगरी
पुण्य फळाले गत जन्माचे
म्हणूनि वसले साई श्रीहरी
मंत्राच्या त्या पुण्यप्रभावे
पावन झाली येथील माती ॥२॥

लीन होऊनी कुणीही यावे
सर्वांना इथे मिळतो थारा
भेद भाव जळूनी मेली
मानवतेचा एक निवारा
साई-साई गाऊ या आता
हात देऊनी आपुले हाती ॥३॥

# साई रूबाई

अमन के चमन में, खिलते है फूल यहाँ
तिलक सी पावन है, साई की धूल यहाँ ।
फिर क्यों भटक रहा तू, दर-बदर पगले
मुरझाकर भी अक्सर, खिलते है फूल यहाँ ।

श्री. डी. बी. जगतपुरीया.
मु. पो. शिरूड, ता. जि. धुळे.

# साई-स्थान

मानवाच्या जीवनात
सुख आहे । दुःख आहे ।
जीवनाच्या प्रवाहात ।
साईचा आधार आहे ।
मानवाच्या भावनेत
संगतीची प्रीत आहे ।
संगतीच्या लहरीत
साईचे सार आहे ।
मानवाच्या हृदयात
दिनरात जाग आहे ।
जागोजाग जागृतीत
साई स्मृति पाठ आहे ।
मानवाच्या जाणिवेत
कला आहे प्रेम आहे ।
कलाप्रिय मानवात
साईचे स्थान आहे ।

सौ. सिंधू कृष्णराव सणस.
मु. पो. काटोळ, गळनाका,
जि. नागपूर.

☆

# बघा एकदा शिरडी

बघा एकदा शिरडी ग्राम
बघाच स्मरूनि साईनाम
दुःख सरूनि सुख खरे
येईल तुमच्या वाट्याला ॥१॥ चला जाऊ या ...

साईनाथ साईनाथ
म्हणा म्हणा रे साईनाथ
गजर होऊ द्या जोरात
ध्वनी भिडू द्या गगनाला ॥२॥ चला जाऊ या ...

असतील जितुके गरीब अनाथ
वाली त्यांना साईनाथ
साई कृपेचा आनंद
मी तरी जीवनी अनुभवला ॥३॥ चला जाऊ या ...

श्री. आकेरकर व्ही. एस.
'साईनिवास' मु. पो. पाट, ता. कुडाळ,
जि. रत्नागिरी.

## साईकृपा

एके सायंकाळी
प्रलय घडला
जलमय झाला
शिर्डी गांव

सारे धाव घेती
साईच्या आश्रया
गोकुळात राया
जैसा कृष्ण

सटका घेवून
आपुल्या हातात
बाबा आला देत
वरुणास

वरुण देव तो
होवूनिया शांत
टाळे विपरीत
साईकृपा

—श्री. ग. दे. कुलकर्णी.
'कुलदीप', तांबरी.
उस्मानाबाद ४१३५०१.

## मंदिरात

पहाटेच्या अंधारात
वाजता दोन पावुले
सुदकन् कुणीतरी
मंदिरात हंसले.
पाषाणांचे नव्हते
मंदिर ते स्फटिकांचे
इवल्याशा हृदयात
माझ्या भावदिपातले
तेथे नसे भाविकांची
झुंबड ना संतमेळा
वासगणू नाही कुणी
अर्पि तुम्हां भक्तीमाळा
येता बाबा मंदिरात
विसरीती देवपण
मीहि माझे 'मी' पण
तुटले मग! मधले कुंपण.

—श्री. विजय व. हजारे.
गुंफादर्शन, बोरीवली.

# झाली साईचरणी विलीन

(श्री साईलीला का. संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांच्या पत्नी सौ. तारा चेंदवणकर यांना भावपूर्ण 'श्रद्धांजली').

आई तू सोडूनी जाता कोसळे आभाळ शिरी
कोसळले आभाळ!
दाही दिशा शून्य भासती
अश्रूनी लोचन पाणावती ।
आई तुज घालूनी हांक
बघ शोषला कंठ
तुज नाहीच पोहचली हाक
परतुनी आले शब्द ।
झाली दृष्टीआड, तुझी प्रेमळ मूर्ती ।
आठवणीला येते भरती
झाली 'साईचरणी' विलीन ।

येतो भरूनी उर, पाझरती नयन ।
आई तू नसता वाटे सरले जीवन ।
माझे मनाचे मन मेले, झाले शून्य जीवन ।
आई तू सोडूनी जाता कोसळे शिरी आभाळ

सौ. कलावती वसंतराव चव्हाण.
अंबाबाई मिस्त्री निवास, बी ६,
सेनापती बापट मार्ग, दादर,
मुंबई – ४०० ०२८.

# जगावेगळी माया वेडी

(सौ. तारा चेंदवणकर यांच्या निधनाने समस्त साईपरिवारावर अपार वज्राघात झाला आहे. दुःखित अंतःकरणाने मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे).

जगावेगळी माया वेडी – माय माझी माऊली
लक्ष्य होते सर्वांवरती – माय माझी माऊली
माऊली ग माझी, माय माझी माऊली ॥धृ.॥

नवरात्रिच्या शुभ घटिकेला 'नवघट' बसता बसता
काय अचानक वीज चमकली, पहाट होता होता
सोडूनी गेली सीमोल्लंघनी, भरूनि मळवट भाळी
माऊली ग माझी, माय माझी माऊली ॥२॥

कसे काय हे घडले देवा! आम्हां काही कळेना
मरणामध्ये जरी पूर्णता, पुनर्जन्म हे कळेना?
कर्मावाचूनी खेळ अधूरा असेच लिहिले भाळी
माऊली ग माझी, माय माझी माऊली ॥२॥

करितो आम्ही जरी निशिदिनी श्रीसाईची भक्ति
संमेल्नी असे उभी पाठीशी मायेची शक्ति
झालो पोरके आता देवा! स्मृति मात्र उरली
माऊली ग माझी, माय माझी माऊली ॥३॥

–श्री राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
पाटकर वाडा, भगतसिंग पथ,
डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे ४२१२०१

# आमुचा तुटला रे आधार

(श्री साईलीला मासिकामधील मानकरी कवयित्री तेजस्विनी कै. सौ. तारा तथा आईसो. चेंदवणकर यांचे चरणी भावपूर्ण श्रद्धांजली).

गगना मधुनीं 'तारा' निखळला
नजरेच्याही पार जाहला
काय इथे हा अनर्थ घडला
तुटला रे आधार । आमुचा तुटला रे आधार ॥१॥
साईलीला लेखक--कवींची
प्रेमळ आई ही सर्वांची
मिठी मायेची तिच्या करांची
कशी आता पडणार । आमुचा तुटला रे आधार ॥२॥
'सदानंदा'ची सदा आनंदी
प्रेमळ 'तारा' होती छंदी
साई पताका घेऊनी खांदी
गेली नजरेपार । आमुचा तुटला रे आधार ॥३॥
सारीपटाचा खेळ मोडूनी
प्रभातकाल ही वेळ साधुनी
प्रेमळ पतीचा निरोप घेऊनी
संपविला अवतार । आमुचा तुटला रे आधार ॥४॥
'सुभाष' 'शुभांगी' धाय मोकलून
शीर आपुले घेती आपटून
म्हणे माते 'तारामती' तू
कां झालीस निष्ठूर । आमुचा तुटला रे आधार !!५॥
'दत्ता पोतनीस' भावाची ही
आज स्मृतिस्तव 'श्रद्धांजलीही'
अर्पण करितो मानून घ्या ही
वंदन हे त्रिवार – ओम् शांती ओम् शांती ओम् शांती
आमुचा तुटला रे आधार ॥६॥

श्री. दत्तात्रय बळवंत पोतनीस.
पिंपरी, पुणे – १७.

# साई-नामाची गझल!!

ज्यांनी मागितला आधार येथे
ते निराधार झाले नाहीत
नाही मिळाले जरी तेल दिव्याला
ज्योत पेटल्याशिवाय राहिली नाही.

लाखोंना देवून श्वास
बाबा कधी थकले नाहीं
फकीराची दुबळी झोळी
खाली कधीच झाली नाहीं.

वेडाही झाला शहाणा येथे
या विना दुजे मंदिर नाहीं
पुण्याची बात कशाला
पापही येथे पवित्र होई.

भेद नका मानू भक्तांनो
येथे बाबाच वसे सर्व ठायी
महाराष्ट्राच्या पुण्यभूमीला
शिर्डीशिवाय सौंदर्य नाहीं
बाबासारखे औदार्य नाहीं

—श्री. जगदीश देवपूरकर.
ग. नं. ५–२६४३,
धुळे ४२४ ००१.

जागे अभावी या अंकात सर्व कविता छापू शकलो नाही त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

—संपादक

[illegible]

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | [illegible] | [illegible] |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | [illegible] | [illegible] |
| २) | ,, | इंग्रजी | [illegible] | [illegible] |
| ३) | ,, | हिंदी | [illegible] | [illegible] |
| ४) | ,, | गुजराथी | १२—०० | ४—०० |
| ५) | ,, | कन्नड | १०—०० | ४—०० |
| ६) | ,, | तेलगू | १३—०० | ४—०० |
| ७) | ,, | तामीळ | १२—०० | ४—५० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७—५० | ३—०० |
| ९) | ,, | हिंदी | ७—०० | ३—५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४—२५ | ३—०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४—०० | ३—०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०—३५ | ३—०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०—३० | ३—०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०—५० | ३—०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०—५० | ३—०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १—२५ | ३—०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५—०० | ३—०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०—७५ | ३—०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४—०० | ३—०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४—५० | ३—०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १—७५ | ३—०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १—७५ | ३—०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १—५० | ३—०० |
| २६) | ,, | हिंदी | १—७५ | ३—०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

(कव्हर पृष्ठ ३ वरून)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | मेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०-५० | ३-०० |
| २८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५-२५ | ३-०० |
| २९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १-५० | ३-०० |
| ३०) | ,, | मराठी | १-५० | ३-०० |
| ३१) | शिरडी गाईड | गुजराथी | १-५० | ३-०० |
| ३२) | ,, | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| ३३) | रुद्राध्याय | मराठी | ०-१० | ३-०० |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०-०० प्रत्येकी प्रत १-००
(व्ही. पी. ने पाठवत नाही)

| अ. क्र. | फोटोचे नाव | फोटो साईज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०" | १-६५ | ३-०० |
| २) | ,, | १०"×१४" | १-१० | ३-०० |
| ३) | ,, | ७"×१०" | ०-५५ | ३-०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०-२० | ३-०० |
| ५) | ,, | २"×३" | ०-१५ | ३-०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १-६५ | ३-०० |
| ७) | ,, (काळा पांढरा) | १४"×२०" | १-६५ | ३-०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २-७५ | ३-०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १-०० | ३-०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२०" | १-१० | ३-०० |
| ११) | ,, (काळा पांढरा) | १०"×१४" | ०-८५ | ३-०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो | ९'×१२' | १-१० | ३-०० |
| १३) | ,, (रंगीत) | ९"×१२' | १-६५ | ३-०० |
| १४) | शिक्का | ९×१३ | ०-७५ | ३-०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६-०० | ८-०० |

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, **संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे**, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४, बी. दादर मुंबई १४.